रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी



NAAC Reaccredited with CGPA of 2.79 at B Grade

# अद्वैत

सन २०१३ - २०१४



चल उडुनी पाखरा पहा जरा । किती रम्य पसरली वसुंधरा ॥

# ।। कर्मवीर जयंती सोहळा ।।



कर्मवीर जयंती सोहळ्यात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ.अरविंद बुरुंगले, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा




कर्मवीर जयंती सोहळा प्रसंगी प्रास्ताविक करताना मा.प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे अधिष्ठाता,विज्ञान विद्याशाखा शि.वि.कोल्हापूर



कर्मवीर जयंती सोहळ्यात मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.श्रीमंत रामराजे निंबाळकर, जनरल बॉडी सदस्य,र.शि.संस्था,सातारा उपाध्यक्ष राज्य नियोजन मंडळ,महाराष्ट्र शासन



कर्मवीर जयंती सोहळा : कर्म ना अभिवादन करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे. रे व प्राध्यापक

## ।। विविध उपक्रम ।।



भूगोल दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.प्रा.डॉ.सुधीर इंगळे, मुधोजी कॉलेज, फलटण



विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.प्रा.पी.एस.जाधव, एल.बी.एस.महाविद्यालय, सातारा



हिंदी दिनानिमित्त हिंदी लेख स्मणिकेचे प्रकाशन करताना प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य डॉ.आर.पी.भोसले कला वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव



प्लेसमेंट सेल तर्फे महाविद्यालयात प्रत्यक्ष मुलाखती घेताना डी.एम.सी.फिनिशिंग स्कूलचे मा.संदीप कदम सहकारी व प्रा.डॉ.संजय खेत्रे

Scanned with CamScanner

पद्मभूषण

# डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील

संस्थापक,रयत शिक्षण संस्था,सातारा



दिव्यत्वाची जेथे प्रचिती ।
तेथे कर माझे जुळती ॥

Scanned with CamScanner

## || आमचे स्फूर्तिस्थान ||



**मा.ना.शरदरावजी पवार**
अध्यक्ष,रयत शिक्षण संस्था,सातारा
कृषी मंत्री,भारत सरकार



**मा.ॲड.रावसाहेब शिंदे**
चेअरमन,रयत शिक्षण संस्था,सातारा



**मा.डॉ.अनिल पाटील**
व्हाईस चेअरमन,रयत शिक्षण संस्था,सातारा

Scanned with CamScanner

|| महाविद्यालयाच्या परिवर्तनाचे शिल्पकार ||

आमचे पथप्रदर्शक




**मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**मा.डॉ.एन्.डी.पाटील**
सदस्य,मॅनेजिंग कौन्सिल,रयत शिक्षण संस्था,सातारा

*सतत झुंजती जे अभिमानी । मार्ग प्रगतिचे जाय सांगुनी ।। निष्ठा ज्यांच्या उरी प्रबळ ती । काळावरती मात करोनी ।।*

## || आमची विद्यार्थी संसद ||



**संदेश जगदाळे**
बी.एस्सी २
विद्यापीठ प्रतिनिधी
एन.सी.सी.



**अनिता निकम**
बी.ए. १
वर्ग प्रतिनिधी



**निवेदिता केंगार**
बी.ए. २
वर्ग प्रतिनिधी



**शहिनाज केंगार**
बी.ए. ३
वर्ग प्रतिनिधी



**रसिका मोहिते**
बी.कॉम. १
वर्ग प्रतिनिधी



**नाजनीन मुल्ला**
बी.कॉम २
वर्ग प्रतिनिधी
काव्यवाचन स्पर्धेत



**वैशाली काटकर**
बी.कॉम ३
वर्ग प्रतिनिधी वि.गुणवत्ता
शिष्य आ.संशोधन
वि.स्पर्धेत तृतीय



**सहेली दोशी**
बी.एस्सी.२
वर्ग प्रतिनिधी



**स्वाती घाटगे**
एम.एस्सी १
वर्ग प्रतिनिधी



**प्रियांका बागल**
एम.एस्सी २
वर्ग प्रतिनिधी



**सागर रणपिसे**
बी.सी.ए. १
वर्ग प्रतिनिधी



**पूजा गायकवाड**
बी.सी.ए. २
वर्ग प्रतिनिधी



**स्नेहल जाधव**
बी.सी.ए. ३
वर्ग प्रतिनिधी



**प्रियांका दडस**
जिमखाना
प्रतिनिधी



**श्रध्दा फडतरे**
एन.एस.एस.
प्रतिनिधी



**गणेश सकट**
सांस्कृतिक
प्रतिनिधी



**अश्विनी वायदंडे**
प्राचार्य नियुक्त
प्रतिनिधी



**प्रियांका बोराटे**
प्राचार्य नियुक्त
प्रतिनिधी

Scanned with CamScanner

# || विविध प्रदर्शन व उपक्रम ||



'उद्योजकता विकास' अंतर्गत आयोजित 'विक्री मेळाव्याचे' उद्घाटन करताना मा.वाघोजीराव पोळ सदस्य, स्थानिक व्यवस्थापन स.दहिवडी कॉलेज दहिवडी


'करिअर फेअरचे' उद्घाटन मा.धनाजीराव जाधव सरपंच,दहिवडी यांच्या हस्ते


'ग्रंथ प्रदर्शनाचे' उद्घाटन करताना मा.मस्के, पोलीस निरिक्षक, दहिवडी


ग्रंथप्रदर्शनात ग्रंथाचे अवलोकन करताना विद्यार्थी


विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, म.गां.ज्यु.कॉलेजचे मा.प्राचार्य कुमार चेंडके व प्राध्यापक


भूगोल विभागाच्या 'वसुंधरा' भित्तिपत्रकाचे उद्घाटन करताना मा.प्रा.सौ.शुभांगी खिलारे, मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलार व विद्यार्थिनी


यु.जी.सी.सी.ओ.सी.टॅली कोर्सच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.प्रा.व्ही.एन.क्षीरसागर


वाणिज्य विभागाच्या 'उद्योजकता' भित्तिपत्रकाचे उद्घाटन करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, प्रा.डॉ.व्ही.डी. जगताप, प्रा.शिकलगार व विद्यार्थी

Scanned with CamScanner

मन मनगट देई, असे सुरेख सुंदर । जीवनात लाभो यश असे नित्य शुभंकर ।।

## ।। आमची यश शिखरे ।।



**चंद्रकांत पवार**
शिवाजी विद्यापीठ
कबड्डी संघात निवड
अश्वमेघ स्पर्धेत गोल्ड मिडल



**सागर बनसोडे**
शिवाजी विद्यापीठ
कॅम्पसाठी निवड इंटर झोनल
कबड्डी स्पर्धेत सहभाग



**नवनाथ बनसोडे**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**विजय बनसोडे**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**गणेश बनसोडे**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**निलेश काटकर**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**राहुल कोळेकर**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**दिनेश काटकर**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**गणेश काटकर**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**चंद्रकांत काटकर**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**राहूल नावगन**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**असिफ मुलाणी**
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**प्रियांका दडस**
सातारा झोनल स्पर्धेत
१०० मी. धावणे द्वितीय
इंटर भालाफेक द्वितीय १०० मी
हर्डल द्वितीय इंटर झोनल स्पर्धेत सहभाग



**भिवा झिंबल**
सातारा झोनल स्पर्धेत ५००० मी.
धावणे द्वितीय इंटर झोनल
स्पर्धेत ५००० मी.
धावणे तृतीय



**गणेश घनवट**
सातारा झोनल स्पर्धेत
१०० मी. धावणे द्वितीय
इंटर झोनल कबड्डी
स्पर्धेत सहभाग



**अश्विनी जाधव**
सातारा झोनल
स्पर्धेत भालाफेक
तृतीय इंटर झोनल
स्पर्धेत सहभाग



**विश्वजित काटकर**
कराटे–गोवा येथे
झालेल्या नॅशनल स्पर्धेत
गोल्ड मिडल



**जयेंद्र जगदाळे**
मध्यप्रदेश-इंदोर येथे झालेल्या
राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट
स्पर्धेसाठी निवड



**राजश्री गायकवाड**
अकोला येथे झालेल्या
राज्यस्तरीय
व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड



**शिवानी काटकर**
राज्यस्तरीय थ्रोबॉल
स्पर्धेसाठी निवड



**निथल रजपूत**
राज्यस्तरीय थ्रोबॉल
स्पर्धेसाठी निवड



**शिवानी स्वामी**
अकोला येथे झालेल्या
राज्यस्तरीय व्हॉलीबॉल
स्पर्धेसाठी निवड

Scanned with CamScanner

## हार्दिक अभिनंदन !

# ।। विविध स्पर्धेतील यशवंत ।।



कु.अर्चना माने
विद्यापीठ
नियतकालिक
स्पर्धेत लेखास
द्वितीय पारितोषिक



अक्षय काळे
आविष्कार आंतर
विद्यापीठ स्पर्धेत
'बेस्ट फाईव्ह'
मध्ये निवड



अभिजीत औताडे
आविष्कार आंतर
विद्यापीठ स्पर्धेत
'बेस्ट फाईव्ह' मध्ये निवड,
तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम



अमृत बोराटे
'किर्लोस्कर' कोल्हापूर
येथे 'काव्यलेखन'
स्पर्धेत पहिल्या
पाचमध्ये निवड



श्री.डी.बी.मोरे
आदर्श
सेवक पुरस्कार

# ।। ज्ञानवंत प्राध्यापक ।।



प्रा.डॉ.ए.एस.भगवान
राज्यशास्त्र विषयात
पीएच.डी.पदवी
प्राप्त आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध वाचन



प्रा.डॉ.बी.एस.बळवंत
हिंदी विषयात
पीएच.डी.पदवी प्राप्त
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध वाचन



प्रा.डॉ.एस.एस.तावरे
प्राणिशास्त्र विषयात
पीएच.डी.
पदवी प्राप्त



प्रा.डॉ.एम.जे.लुबाळ
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध प्रसिध्द



प्रा.डॉ.व्ही.एस. जमदाडे
आंतरराष्ट्रीय परिषदेत
शोधनिबंध
वाचन व प्रसिध्द



प्रा.एस.बी.रणधीर
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध प्रसिध्द



प्रा.ए.एन.दडस
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध प्रसिध्द



प्रा.व्ही.व्ही.कांबळे
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध प्रसिध्द



प्रा.बी.एस.लोकडे
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध प्रसिध्द



प्रा.एस.एन.पवार
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
चार शोधनिबंध प्रसिध्द मायनर
रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण



प्रा.एन.व्ही.शिंदे
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
शोधनिबंध वाचन
व प्रसिध्द



प्रा.डॉ.आर.आर.मुल्ला
मायनर रिसर्च
प्रोजेक्ट पूर्ण



प्रा.एस.बी.वाघमोडे
मायनर रिसर्च
प्रोजेक्ट पूर्ण



महाविद्यालयात आर.टी.एस. प्रकल्पाअंतर्गत
अभ्यास नियोजन समितीचे चेअरमन
मा.आर.के.शिंदे, मा.डॉ.जे.जी. जाधव
व इतर मान्यवर

Scanned with CamScanner

# ।। राष्ट्रीय परिषद ।।



रसायनशास्त्र राष्ट्रीय परिषद उदघाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, अधिष्ठाता विज्ञान विद्याशाखा शि.वि.को.



रसायनशास्त्र राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना
मा.डॉ.कुमार स्वामी, सिमोगा, युनिव्हर्सिटी धारवाड, कर्नाटक



रसायनशास्त्र राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य डॉ.के.जी.कानडे
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर



प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना
प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य डॉ.संजय खरात, मॉडर्न कॉलेज पुणे



प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना
मा.प्रा.डॉ.रॉड्रीग्ज, गोवा विद्यापीठ



प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना
मा.प्राचार्य डॉ.सुनिल कांबळे, डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव



राज्यशास्त्र व इतिहास विभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेत बीजभाषण
करताना मा.प्राचार्य डॉ.सी.एस.पाटील युनिव्हर्सिटी लॉ.कॉलेज,धारवाड,कर्नाटक



राज्यशास्त्र व इतिहास विभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेत समारोप प्रसंगी
बोलताना मा.प्राचार्य डॉ.बी.एच.चौधरी, बालाजी युनिव्हर्सिटी, आंध्रप्रदेश

Scanned with CamScanner

# ।। विद्यापीठ व अग्रणी कॉलेज अंतर्गत कार्यशाळा ।।



वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य डॉ.पी.एन.गायकवाड, सौ.मं.रा.जगताप महिला महाविद्यालय उंब्रज



बी.ए.भाग १ हिंदी बदलेल्या अभ्यासक्रमावर एक दि[illegible]य कार्यशाळेत दीपप्रज्वलन करताना मा.डॉ.राम नकाते, डॉ.रु[illegible]ना मुला, मा.डॉ.[illegible] खिलारे, मा.प्राचार्य डॉ.प्रकाश मोकाशी, [illegible].सुनिल बनसोडे



अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा.डॉ.डी.के.मोरे, अधिसभा सदस्य, शि.वि.कोल्हापूर



सातारा झोनल बुध्दिबळ स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी बोलताना मा.प्रा[illegible]जे.खिलारे, अधिष्ठाता विज्ञान विद्याशाखा शि.वि.कोल्हापूर



Academic Performance Indiacators (API) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य डॉ.अर्जुन राजगे,चेअरमन,बी.सी.यु.डी.शि.वि.कोल्हापूर



Academic Performance Indiacators (API) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेत समारोप प्रसंगी बोलताना मा.प्रो.डॉ.व्ही.बी.जुगळे,माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शि.वि.कोल्हापूर



एम.एस्सी २ रसायनशास्त्र बदलेल्या अभ्यासक्रमावर एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा.प्रा.डॉ.एस.आर. पाटील शि.वि.कोल्हापूर



एम.एस्सी २ रसायनशास्त्र बदलेल्या अभ्यासक्रमावर एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा.प्रा.डॉ.एस.टी.साळुंखे, बळवंत कॉलेज, विटा

Scanned with CamScanner

जीवनपथ हा जरी अडलेला । जिद्दीने पाऊल उचला यश वेचाया पुढे चला ।।

## ।। आमची राष्ट्रीय छात्र सेना ।।



नितीन ओंबासे
सिनि. अंडर ऑफिसर



'रस्ते सुरक्षा सप्ताह' निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.मस्केसाहेब, पोलिस निरिक्षक, दहिवडी



भारतीय स्वातंत्र्यदिनी ध्वजास मानवंदना देण्यासाठी उपस्थित विद्यार्थी



संदेश जगदाळे
ज्यु.अंडर ऑफिसर



एन.सी.सी.छात्रांची पाहणी करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, एन.सी.सी.प्रमुख कॅप्टन माने टी.एस.



प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांना संदेश देताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे,अधिष्ठाता,विज्ञान विद्याशाखा शि.वि.कोल्हापूर



नितुल शिंदे
ज्यु.अंडर ऑफिसर



'राष्ट्रीय मतदान दिना' निमित्त विद्यार्थ्यांना शपथ देताना प्रांत अधिकारी, मा.श्रीनाज मुल्ला, तहसिलदार मा.महेश पाटील, मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे व प्राध्यापक



एडस रॅलीमध्ये सहभागी छात्रां समवेत कॅप्टन माने टी.एस. व सुभेदार मा.साळुंखे



प्रविण कदम
बेस्ट कॅडेट



गरीब व होतकरू विद्यार्थिनींना 'सायकल' सुपर्त करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे व प्राध्यापक



इतिहास विभाग 'औंध' येथील सहलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक

Scanned with CamScanner

# ।। राष्ट्रीय सेवा योजना : विविध उपक्रम ।।



महाविद्यालयाच्या मैदानावर लॉनची लागवड करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी



'विधी साक्षरता' शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.व्ही.बी.घाडगे न्यायाधीश दहिवडी



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या 'शिक्षक दिना' निमित्त विद्यार्थ्यांशी हितगुज करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे खिलारे अधिष्ठता विज्ञानशाखा शि.वि.कोल्हापूर



क्षयरोग व एडस या विषयावर विद्यार्थ्यांना समुपदेशन करताना मा.श्रीमती शितल जगताप




डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'जयंती' निमित्त प्रतिमेचे पूजन करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे व प्राध्यापकवृंद



'योगाचे जीवनातील महत्त्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.डॉ.गीता कुलकर्णी



लेक वाचवा व व्यसनमुक्ती जनजागृती रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी विद्यार्थिनी



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.प्रा.पी.एन.शिंदे राजा भगवंतराव श्रीपतराव महाविद्यालय औंध

सोडुनिया गेह घेई अनुभव । मनुजा तू बघ विश्व सुंदर ।।

# ।। वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०१३-१४ ।।



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक करताना मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, अधिष्ठाता विज्ञानशाखा शि.वि.कोल्हापूर



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.निलेश साबळे, अभिनेता (फु बाई फु फेम)



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना 'साहित्यिक' मा.शहाजीराव बळवंत



प्रमुख पाहुणे 'अभिनेता' मा.निलेश साबळे यांचे हस्ते आविष्कार संशोधन पारितोषिक स्वीकारताना अक्षय काळे



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल वाचन करताना प्रा.डॉ.व्ही.डी.जगताप



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात जिमखाना विभागाचा अहवाल वाचन करताना जिमखाना प्रमुख प्रा.उदय शिंदे



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष मा.शहाजीराव बळवंत यांच्याकडून 'आदर्श शिक्षक' पुरस्कार स्वीकारताना प्रा.ए.एस.आलेकरी



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यापीठ प्रतिनिधी, संदेश जगदाळे आभार प्रदर्शन करताना

Scanned with CamScanner

## || सांस्कृतिक विभाग ||



महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांचेकडे विद्यार्थी प्रतिनिधी गणेश सकट 'वाद्य' भेट देताना



'युवा दिना' निमित्त 'काव्यवाचन' स्पर्धेत प्रथम क्रमांक यशस्वी विद्यार्थिनी कु.नाजनीन मुल्ला कविता सादर करताना



जिल्हा स्तरीय युवा महोत्सव पुसेगाव येथे 'वाद्यवृंद' कलाकार कला सादर करताना स्पर्धक



पुसेगाव जिल्हा स्तरीय युवा महोत्सवात 'लोककला' प्रकारात तृतीय क्रमांक मिळविणारे कलावंत सादरीकरण करताना



अभिनेता निलेश साबळे यांचे हस्ते 'पथनाट्याचे' द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना यशस्वी कलाकार



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा.निलेश साबळे यांचा 'नटराज मूर्ती' देऊन सत्कार करताना सांस्कृतिक प्रतिनिधी गणेश सकट



मतदान जागृती दिनानिमित्त प्रांत अधिकारी मा.मुल्ला, तहसिलदार मा.महेश पाटील प्राचार्य मा.डॉ.सी.जे.खिलारे यांच्या उपस्थितीत 'पथनाट्य' सादर करताना कलाकार



'माजी विद्यार्थी सस्नेह मेळाव्यात' बोलताना माजी विद्यार्थी मा.प्राचार्य धर्मराज शिंदे

Scanned with CamScanner

स्थापना : १९६५

रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

फोन : (०२१६५) २२०२३१

# अद्वैत

वार्षिक नियतकालिक २०१३-२०१४

प्रमुख संपादिका

**प्रा.सौ.सुलोचना बापू वाघमोडे**

मराठी विभाग

Scanned with CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

# अद्वैत

## वार्षिक नियतकालिक २०१३-२०१४

### संपादक मंडळ

अध्यक्ष व प्रकाशक

**प्राचार्य डॉ.चंद्रकांत जे.खिलारे**

प्रमुख संपादिका

**प्रा.सौ.सुलोचना बी.वाघमोडे**

विभागीय संपादक

मराठी **प्रा.नामदेव शिंदे**

हिंदी **प्रा.डॉ.सौ.रुखसाना मुल्ला**

इंग्रजी **प्रा.सुभाष रणधीर**

विज्ञान **प्रा.संजय खेत्रे**

कनिष्ठ **प्रा.एच.जी.पोरे**

फोटो **प्रा.मन्सूर शिकलगार**

अहवाल **प्रा.सुभाष रणधीर**

कलादालन

**प्रा.डॉ.विनायक जमदाडे**

रयत शिक्षण संस्था सातारा 'कर्मवीर पारितोषिक' महाविद्यालयीन स्पर्धेत आमचे यश : २०१३-१४ चे 'कर्मवीर पारितोषिक' दहिवडी महाविद्यालयास प्राप्त

अक्षरजुळणी - टाईप इनोव्हेटर्स, १९५, सदाशिव पेठ, वीर सावरकर मार्ग, सातारा. दूरध्वनी ०२१६२-२३४३७२
मुद्रक - प्रिन्ट ओम ऑफसेट, २६९ ब/२, दौलतनगर, करंजे, सातारा. दूरध्वनी ०२१६२-२३४०४९/२३२०८२

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. मजकुराची जबाबदारी पूर्णतः संबंधित लेखकाची.

Scanned with CamScanner

# महाविद्यालयाचे अंतरंग




Scanned with CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा. | |
| सभासद | मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | |
| सभासद | मा.वाघोजीराव पिलाजीराव पोळ | |
| सभासद | मा.नारायणराव एकनाथ माने | |
| सभासद | मा.प्रा.अरविंद रघुनाथ माळी | प्राध्यापक प्रतिनिधी |
| | मा.प्रा.श्रीशैल्य रामलिंग स्वामी | प्राध्यापक प्रतिनिधी |
| | मा.प्रा.बाळासाहेब शिवाजी बलवंत | प्राध्यापक प्रतिनिधी |
| सभासद | श्री.कांतीलाल चंद्रकांत खाडे पाटील | शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी |
| सचिव | मा.प्राचार्य | दहिवडी कॉलेज दहिवडी |

## फॉर्म नं.४ नियम

**'अद्वैत' या वार्षिक नियतकालिकेच्या स्वामित्व व इतर बाबी विषयी निवेदन -फॉर्म ४ नियम ८अ नुसार**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | ......... | दहिवडी कॉलेज दहिवडी, फोन नं. २२०२३१ |
| नियतकाल | ......... | वार्षिक |
| प्रकाशकाचे नाव | ......... | प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे |
| राष्ट्रीयत्व | ......... | भारतीय |
| पत्ता | ......... | दहिवडी कॉलेज दहिवडी |
| संपादकाचे नाव | ......... | प्रा.सौ.सुलोचना बापू वाघमोडे |
| राष्ट्रीयत्व | ......... | भारतीय |
| पत्ता | ......... | दहिवडी कॉलेज दहिवडी |
| मालकी | ......... | दहिवडी कॉलेज दहिवडी |
| मुद्रकाचे नाव | ......... | संदेश शहा |
| राष्ट्रीयत्व | ......... | भारतीय |
| पत्ता | ......... | 'प्रिंट ओम ऑफसेट', २६९ ब/२, दौलतनगर, करंजे, सातारा. |
| अक्षररचना | ......... | प्रशांत गुजर |
| राष्ट्रीयत्व | ......... | भारतीय |
| पत्ता | ......... | 'टाईप इनोव्हेटर्स' १९५, सदाशिव पेठ, वीर सावरकर मार्ग, सातारा. |

मी प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे असे जाहीर करतो,
की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

Scanned with CamScanner



# संपादकीय

'इये मराठीचे नगरी सुविद्येचा सुकाळ' आणि 'साहित्य सोनियाच्या खाणी उघडून' देणाऱ्या कवीश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या मराठी नगरीत कवी कलावंतांची मांदीयाळी सातत्याने वाढतच असते. इथे सारस्वताची उद्याने रसभावरूपी फुला-फळांनी बहरलेली असतात. अशा महाराष्ट्र परंपरेत भर घालणारे आमच्या महाविद्यालयातील उमलते कवी कलावंत संशोधक, विचारवंत आपल्याशी रससंवाद करण्यासाठी वर्षभर अतुर असतात. या सर्वांना आपल्या समोर घेऊन येण्यासाठी सन २०१३/१४ या वर्षाचा अद्वैत अंक साकार करताना आनंद होत आहे.

माणच्या भूमीत रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाची पारंबी रूजत आहे. तीन अंकी संख्येवर सुरू झालेले महाविद्यालय पाच अंकावर जाऊन गुणात्मक आणि संख्यात्मक प्रगती करीत सुवर्ण वर्षाकडे वाटचाल सुरु आहे. निकालाची परंपरा कायम ठेवून विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी महाविद्यालय कार्यरत आहे. गतवर्षी प्रकाशित अद्वैत मधील कु.अर्चना माने या विद्यार्थिनीच्या 'बाबा आमटे' या चरित्रपर लेखाला विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळाले. ही आमच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. या अंकातून लिहिणारे भविष्यात मराठी साहित्याच्या प्रांतात चमकणारे तारे बनतील अशी आशा आहे.

अद्वैत अंक हा महाविद्यालयीन तरुणांचा आणि भावनांचा आविष्कार आहे. मानवी मनाचे धागे उलगडण्याचे, अंतरिक भावना प्रगट करण्याचे, मनामनातील दुवा, साधण्याचे काम साहित्य करते. वाचकांना डोळस बनविणारं साहित्य हे एक साधन होय म्हणूनच अद्वैत अंकाला वाङ्मयीन स्पर्श आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला त्याच्या

Scanned with CamScanner

उद्गाराला वाव देण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले व्यासपीठ आहे. शब्द म्हणजे खरे विश्व. त्यातूनच जीवनाचं एक नेमकं तत्त्वज्ञान मांडले जाते. नवोदित कवी साहित्यिक व विचार करणारी नवतरुण पिढी यांच्यासाठी एक स्वागतशील व सातत्य जपणारे व्यासपीठ म्हणजे अद्वैत नियतकालिक होय. या नवोदितांच्या साहित्यातून वर्तमानाविषयी जाणीव भूतकाळाविषयी आदर आणि भविष्याविषयची नवी स्वप्ने यांचा समन्वय त्यांच्या कल्पनेतून प्रतिभेतून प्रकट होणारे ललित साहित्य, स्फुरणारी कविता, घडणारे नाटक असे ललित साहित्य तर येतेच तसेच मनोवेधक व विचारगर्भ वास्तवाच्या प्रत्यक्ष अनुभवातून प्रकट होणारे ललितेतर वैचारिक लेखन येते.

अंकाची मांडणी करताना जीवनाला प्रेरणा देणाऱ्या अनमोल घटना, पुरस्कार या सर्व घटनांचे पडसाद या विद्यार्थी लेखकांवर पडल्यावाचून कसे राहतील ? त्यासंबंधीचे लेख इथे आवर्जून आले आहेत. मराठी आपली मातृभाषा तिच्यातून अभिव्यक्त होण्यासाठी प्रत्येक शाखेतल्या विद्यार्थ्यांची धडपड असते. या रचनांमध्ये नवेपणा ठायी ठायी आहे. सरावाने प्रयत्नाने परिपक्व होतील. ही अपेक्षा ठेवून आम्ही हे साहित्य दालन आपल्यापुढे मांडीत आहोत.

महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक ग्रंथपाल, नियतकालिक सदस्य, कार्यालयीन सेवक, विद्यार्थी, लेखक, कवी, श्री.संदेश शहा आणि श्री.प्रशांत गुजर या सर्वांनी सहकार्य केले. त्याबद्दल आभार. मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांनी सतत स्फूर्ती दिली, संपादक होण्याची संधी दिली. वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्याबद्दल मनःपूर्वक आभार. ज्ञात अज्ञात या सर्वांच्या सहकार्यामुळे अद्वैत अंक आकाराला आला आहे या सर्वांचे आभार.

प्रा.सुलोचना वाघमोडे

# प्राचार्यांचे मनोगत



सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाचा अद्वैत हा वार्षिक नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. महात्मा फुले, महर्षि शाहू आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन समाज परिवर्तनाचे साधन शिक्षण हेच आहे. हे कर्मवीर आण्णांनी जाणून महाराष्ट्राच्या भूमीमध्ये शिक्षणरूपी वटवृक्षाचे बीज रूजविले. त्यांचे शैक्षणिक कार्य समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत अखंडितपणे चालू आहे. नवा विचार, नवी दृष्टी, नव्या आशा, आकांक्षा, द्रष्टा माणूस म्हणजे कर्मवीर. समग्र माणुसकीची लेणी खोदणारे शिल्पकार कर्मवीरांच्या परिवर्तनवादी विचारांतून तयार होत आहेत. त्यांची विचारसरणी प्रगतीशील समाजव्यवस्थेची स्वप्न पाहणारी होती. आमचा अद्वैत अंक म्हणजे नवोदित साहित्यिक कवी यांना उपलब्ध करून दिलेले व्यासपीठ आहे. त्याचबरोबर प्राचार्य म्हणून आपणासमोर बोलण्यासाठीचे आणि शब्दरूपात मन मोकळे करताना वेळेच आत्मिक समाधान होत आहे.

दहिवडी महाविद्यालय २०१४-२०१५ मध्ये सुवर्ण वर्षात पदार्पण करीत आहे. आधुनिकतेच्या या काळात त्या दिशेने महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे. कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए., एम.एस्सी. रसायनशास्त्र, बी.एस्सी. कॉम्प्युटर विषय आणि एम.फिल. पीएच.डी. च्या सुविधा उपलब्ध आहेत. माहविद्यालयात वनस्पीशास्त्र विषयात आठ व रसायनशास्त्र विषयात दोन विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत अशा विविध प्रकारच्या शिक्षणाच्या सोयीनी महाविद्यालयाचे ज्ञानदानाचे कार्य प्रगतीपथावर आहे.

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला, गुणवत्तेला कौशल्याची, सकारात्मक विचारांची जोड देण्याचा सतत प्रयत्न चालू आहे. चांगला वृक्ष, चांगले फळ, उत्तम गायक, सुगंधी फूल यांची ओळख जशी पाहताक्षणीच पटते. तीच विद्यार्थी घडविण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यांच्या ज्ञानाची खोली व व्याप्ती वाढविणे आपले कर्तव्य आहे. त्या दिशेने मार्गक्रमण करणे अत्यंत गरजेचे आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबर विविध उपक्रमांतून प्रयोगशीलतेतून विद्यार्थी घडविणे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमधून व्यावसायिक कोर्सेस सुरू केलेले आहेत. यु.जी.सी. मान्यताप्राप्त कोर्सेसमध्ये कॉमर्स विभाग टॅली, बायोटेक्नॉलॉजी, योगा हे करिअर ओरिएंटेड कोर्सेस सुरू केले आहेत. ग्रामीण पत्रकारिता कोर्स, व्यक्तिमत्व विकास, हाऊस होल्ड केमिकल्स, एच.आर.डी. सारखे शॉर्ट टर्म कोर्सेस आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयातील 'प्लेसमेंट सेल' तर्फे कॅम्पस इंटरव्ह्यूमधून विविध बँका, संस्थांमधून ९३ विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत.

महाविद्यालयातील क्रीडा विभागाने सातारा झोनल बुध्दीबळ स्पर्धेचे नेटके आयोजन केले. इंटर झोनल ॲथेलेटिक्स, आणि कबड्डीस्पर्धेत चंद्रकांत पवार याने सुवर्ण पदक मिळविले. इंदोर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत जयंत जगदाळे सहभागी झाला. पूनम जाधव

या विद्यार्थिनीची पी.एस.आय.मधून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. गतवर्षी अद्वैतमधील अर्चना मानेच्या लेखास विद्यापीठाचे द्वितीय पारितोषिक मिळाले. वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. विभाग या सर्वच विभागांनी परिश्रमपूर्वक विद्यार्थी घडविण्याचे काम केले. या वर्षी एन.एस.एस. चे विशेष श्रम संस्कार शिबीर वावहिरे येथे आयोजित केले होते. त्यात अनेक उपक्रम राबविले. यावर्षी महाविद्यालयाचे सर्वच वर्गांचे निकाल उत्तम असून कु. वैशाली काटकर या विद्यार्थिनीला विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली.

चालू शैक्षणिक वर्षात विचार आणि संशोधन यांना चालना मिळावी म्हणून राज्यशास्त्र, इतिहास, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र आणि रसायनशास्त्र या विभागांनी राष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले. हिंदी, अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग, प्लेसमेंट सेल स्पर्धा परीक्षा व करिअर कॉन्सिलिंग या विभागांनी कार्यशाळा आयोजित केल्या. विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण व्हावे म्हणून मार्केटिंग स्टॉल, विज्ञान प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, करिअरच्या संधी पोस्टर प्रेझेंटेशन अशा विविध उपक्रमांचे महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजन केले. महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे अभ्यास केंद्रही चालविले जाते. त्याचा लाभ या वर्षी सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी घेतला आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापक संशोधन करीत आहेत. प्रा.ए.एन. दडस, प्रा.एन.व्ही. शिंदे, प्रा.डॉ.एम.जे. लुबाळ, प्रा.व्ही.व्ही. कांबळे, प्रा.डॉ.व्ही.एस. जमदाडे, प्रा. एस.एन. पवार यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात संशोधन पेपर वाचन व प्रसिध्द केले. आंतरविद्यापीठीय आविष्कार आविष्कार स्पर्धेत बेस्ट फाईव्ह मध्ये अक्षय काळे व अभिजीत औताडे यांनी यश मिळविले. प्रा.डॉ.ए.एस. भगवान, प्रा.डॉ.बी.एस. बळवंत, प्रा.डॉ.एन.के. पाटोळे, प्रा.डॉ.एस.एस. तावरे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. प्रा.डॉ.आर.आर. मुल्ला, प्रा.एस.बी. वाघमोडे, प्रा.एस.एन. पवार यांचे मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण करून यु.जी.सी. ला पाठविले आहेत. या सर्वांचे अभिनंदन.

आपणास सांगण्यास अत्यंत आनंद वाटतो की यु.जी.सी. अनुदानातून क्रीडा संकुलाची भव्य आणि देखणी इमारत पूर्ण झाली आहे. व बास्केट बॉल कोर्टचे काम पूर्ण झाले आहे. कनिष्ठ विभागाच्या वाढीव वर्गखोल्या व प्रयोगशाळेचे काम पूर्णत्वाकडे जात आहे. महाविद्यालयास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा.ॲड. रावसाहेब शिंदे व सौ.शशिकलाताई शिंदे, व्हाईस चेअरमन मा.डॉ.अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा.डॉ.एन.डी.पाटील, सचिव मा.प्राचार्य डॉ. अरविंद बुरूंगले, सहसचिव मा.डॉ. नानासाहेब गायकवाड, शिवाजी विद्यापीठाचे बी.सी.यु.डी. चे चेअरमन मा. प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे यांनी महाविद्यालयास भेटी देऊन महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

संस्था पदाधिकारी, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, एल.एम.सी. सदस्य, माजी विद्यार्थी, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर सेवक, देणगीदार व हितचिंतक या सर्वांचे मनःपूर्वक आभार व भविष्याच्या वाटचालीसाठी व प्रगतीसाठी सहकार्याची अपेक्षा करून आपण सर्वजण कार्यक्षमतेने महाविद्यालयाचा लौकिक वाढवू या.

धन्यवाद ! जय कर्मवीर !!

**प्राचार्य डॉ.सी.जे. खिलारे**

Scanned with CamScanner

## मुखपृष्ठाविषयी...

संकल्पना : प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे



चल उडुनि पाखरा पहा जरा ।
किती रम्य पसरली वसुंधरा ।।

माण परिसर हा दुष्काळग्रस्त परिसर आहे. नेहमीच पाण्याच्या अवर्षणाला सामोरे जावे लागते. येथे नसेल पुरेसा पाऊस अशाही परिस्थितीत महाविद्यालयाचा परिसर वृक्षांनी बहरला आहे. अद्वैत नियतकालिक मुखपृष्ठासाठी महाविद्यालयातील नारळाच्या झाडांचे छायाचित्र निवडले आहे. या पाठीमागचा हेतू हा की, नारळाची झाडे उंचच्या उंच असतात. नारळाचे फळ मजबूत असते. कोणत्याही शुभ प्रसंगी नारळ शुभसूचकतेचे, मजबूततेचे प्रतिक म्हणून दिले जाते. नारळाचे झाड म्हणजे कल्पवृक्ष असे संबोधले जाते. आजारी माणसाला शेवटचा आधार नारळातील पाण्याचा होत असतो. याच नारळावर अनेक प्रकारचे पशुपक्षी आश्रयाला येतात. आणि पंखात बळ आले की, आकाशात झेप घेतात. त्याचप्रमाणे वाटते कर्मवीर आण्णांनी महाराष्ट्राच्या भूमीमध्ये शिक्षणरुपी रयत शिक्षण संस्थेचे बीज पेरले. त्याचा बीजाचा एक भाग म्हणजे हे महाविद्यालय. या महाविद्यालयातून अनेक विद्यार्थी शिकले. उंच भरारी घेतली. आजही शिकत आहेत. अशीच महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी हे बोल वाचक रसिकांनी सत्यात आणावेत. इथे पाण्याचा अभाव असला तरी सतत ज्ञानाचा कुंभ, वनराईचे सौंदर्य, पक्षांची सलगी ठेवावी अशी आस आहे.

**संपादक - प्रा.सौ.एस.बी.वाघमोडे**

## श्रध्दांजली...

*२०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षामध्ये रयत शिक्षण संस्थेशी व महाविद्यालयाशी विविध नात्यांनी संबंधित असलेल्या काही व्यक्ती तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती या सर्व व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या दुःखात 'अद्वैत' परिवार सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो !*




# दहिवडी कॉलेज : कल - आज और कल

प्रा.डॉ.रुखसाना रज्जाक मुल्ला, अध्यक्षा-हिंदी विभाग

■



''दिल और दिमाग जहाँ एक हो गये
काँटों की जगह जहाँ फूल खिल गये
खिजाँ की जगह जहाँ बहार आ गयी
ज्ञान और प्रयास जहाँ एक हो गये
प्रकृति भी जिसे झुककर सलाम करती हैं
अकाल में भी जहाँ फूल खिलते हैं
ऐसा कॉलेज है दहिवडी का
जहाँ आकर अज्ञानी जीव
ज्ञानामृत पी तृप्त होता हैं
जिस की नींव डाली महान कर्मयोगी
कर्मवीर भाऊराव पाटील ने !''

यह दृश्य हैं २०१४ का, जहाँ सब कुछ हैं । जिस में प्रवेश [illegible] ही मुख से शब्द निकलते है - 'ओह ! कितना सुंदर कॉलेज है !' प्रवेश मार्ग पर दोनों ओर उँचे उँचे श्रीफल के वृक्ष मानो आनेवाले नवागंतुक को सलामी दे रहे हैं । भव्य प्रशस्त अट्टालिका, महाविद्यालय की शान बढा रही है और सबसे बडी खासियत जो आस पास के कॉलेज में नहीं है, हमारे कॉलेज में है वह प्ले ग्राऊंड, बॉस्केटबॉल ग्राऊंड जिसने कॉलेज की शान में चार चाँद लगा दिए हैं । यह सब देखते देखते मन पखेरू एक क्षण में अतीत में उड जाता है । अतीत की स्मृतियाँ उजागर होने लगती हैं । अपनी आँखों पर विश्वास करे या अतीत को याद करें ? प्रश्न उपस्थित होता हैं ।

सच हैं समय बडा बलवान होता है, उसमें इतनी शक्ति होती है, कि वह देखते देखते सब कुछ बदल देता हैं । यह प्रकृति सदैव घूमती है, उसमें परिवर्तन होता हैं । परिवर्तन यह प्रकृति का नियम ही है, किंतु उफ् इतना परिवर्तन, जिस का धुंधलासा रूप भी कभी दिखाई नहीं दिया था ।

सन १९८४ अगस्त की घटना है । मैं कराड शहर के वेणुताई चव्हाण महाविद्यालय में कार्यरत थी, एक दिन संदेशा आया, कि मेरा चयन रयत शिक्षण संस्था के शाहू महाविद्यालय में हिंदी अध्यापक के रुप में हुआ है । मेरी शिक्षा एम्.ए. पीएच्.डी. शिवाजी विश्वविद्यालय में हुई थी, अतः कोल्हापूर से मुझे लगाव था, मुझे आनंद हुआ और एक क्षण में मैंने कराड से रुखस्त लेने का निर्णय लिया; क्योंकि मैं आगे कुछ करना चाहती थी । सच हैं मानव जो सोचता है वैसा होता नहीं । प्राचार्य डॉ. टी.के. पवारजी ने मुझे अपने महाविद्यालय



Scanned with CamScanner

दहिवडी में ले लिया । कराड छोड चुकी थी, कोल्हापूर जाना चाहती थी; किंतु पहुँची दहिवडी, यही नियती हैं ।

दहिवडी कॉलेज की ऑर्डर लेकर हम दहिवडी पहुँचे, कॉलेज की खोज करते करते पहुँचे महात्मा गांधी विद्यालय में । सोच में पड गये यह तो विद्यालय हैं - सामनेवाले व्यक्ति ने हँसते हँसते कहा-मॅडमजी यही कॉलेज हैं । हाईस्कूल की एक ओर की एक छोटीसी इमारत की ओर इशारा करके वह चला गया । मन में विचार आया कहाँ निकले थे कहाँ पहुँच गये । वापस लौटना मुमकिन नहीं था आगे बढना ही था ।

मेरा सफर किसनवीर महाविद्यालय, वाई से आरंभ होकर विश्वविद्यालय कोल्हापूर तथा मराठी विश्वकोश, वाई से वेणुताई कॉलेज कराड से दहिवडी तक पहुँच चुका था । एक क्षण विचार आया कि वापस लौट चले, किंतु जीवन में आगे बढना ही जीना हैं नियमानुसार हम आगे बढ़े, प्राचार्य डॉ. टी.के. पवार ने हमारा सहर्ष स्वागत किया और हिंदी विभाग के भविष्य को उज्ज्वल बनाने की अपेक्षा व्यक्त की । विचार आया जहाँ हमारी जरूरत हैं, वहाँ कार्य करने से आनंद मिलता है और कार्य आरंभ हुआ । महात्मा गांधी विद्यालय में स्थित दहिवडी कॉलेज कार्यालय और प्रत्यक्ष में शिक्षादान का कार्य इमारत बनाई जा रही थी, वहीं पर मिट्टी, पत्थर के बीच चल रहा था । बी.ए. भाग १ और बी.ए. भाग २ के क्लासेस हो रहे थे; किंतु तृतीय वर्ष का अध्यापन कार्य बंद था, उस समय कॉलेज में तृतीय वर्ष के इतिहास, अंग्रेजी, मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल के विभाग थे । हिंदी विभाग में तृतीय वर्ष आरंभ करने के लिए छात्रों की खोज आरंभ हुई, क्योंकि हर विभाग की छात्रसंख्या आवश्यक उतनी ही थी । हिंदी छात्रों को खोजना, मिलना, मतपरिवर्तन करना और फिर शुल्क स्वयं भरना यह सिलसिला आरंभ हुआ और विभाग आरंभ हुआ । उस समय कॉलेज की आर्थिक स्थिती बिकट थी, इमारत बनाना बहुत मुश्किल कार्य था । प्रा.डॉ. टी.के. पवार सर तथा उस समय के सभी अध्यापकोंने अपनी ओर से हर तरह से कॉलेज की मदद की । घर-घर, दुकान-दुकान, खेत-खलियान, बाजार कोई भी जगह ऐसी नहीं छोडी कि जहाँ से मदद मिल सकती हैं ।

माण तालुका अकालग्रस्त, नित्य ही प्रकृति का कोप सहता फिर भी आगे बढनेवाला तहसील । यहाँ के लोगों में जिद्दत अधिक हैं । कवि कालिदास के पद स्पर्श से यहाँ के लोगों में बुध्दि और प्रतिभा की कमी नहीं हैं, पासबां शिव शंभू की कृपा से इस आंचल के लोग एक बार जो ठाण लेते उसे हर हाल में पूरा करते ही हैं । आरंभ में शासन की ओर से उतना अर्थ सहाय्य नहीं मिलता; जितनी जरूरत होती, ऐसे समय चंदा इकट्ठा करना, मनोरंजन का कार्यक्रम आयोजित [illegible] पड़ता था । परिणामतः इमारते खड़ी होने लगी, छात्रसंख्या बढ़ने लगी और अध्यापन का कार्य आनंददायक होने लगा । माण तहसील की मिट्टी में जो विशेषता हैं, यहाँ के छात्रों में जो बर्दाश्त की ताकत हैं, जो समझदारी हैं, वह शहरी छात्रों में नहीं होती हैं । छात्रों ने कभी मिट्टी गिट्टी, बालू, फरशी पर बैठने से इंन्कार नहीं किया । कई बार क्लासेस बाहर मैदान में भी ली जाती थी ।

समय कभी रूकता नहीं, वह अपनी चाल आगे चलता है । आज जो 'बी' विंग है, उसका एक हिस्सा बना और उपर का काम शुरू हुआ । उसे देख सबों को आनंद हुआ । इस के आसपास केवल घास ही घास था और वह भी नुकोला फिर भी छात्रों की लगन और जिद्दतने उन्हें आगे बढ़ाया, उँचे पदों पर पहुँचाया । कर्मवीर भाऊराव पाटील नें जिस उद्देश्य से इस पत्थरिली जमीन को नंदनवन में परिवर्तीत करने का दृढ़ निश्चय किया था, वह उद्देश्य सफलता की ओर बढ़ने लगा । छोटासा पौधा एक बडे बरगद के पेड में परिवर्तीत होता नजर आने लगा ।



Scanned with CamScanner

कला, वाणिज्य, विज्ञान शाखाएँ फलने फूलने लगी । कॉलेज कर्मचारी संख्या बढने लगी और आवश्यकतानुसार सुविधाएँ बढ़ने लगी । शासन अनुदान मिलने लगा और इस पतझड में बहार आई । चार पाँच कमरों का कॉलेज असंख्य क्लासरूम में परिवर्तीत हुआ । कनिष्ठ-वरिष्ठ महाविद्यालय में हजारों छात्र ज्ञानार्जन करने लगे । व्यावसायिक शिक्षा विभाग शुरू हुआ । विज्ञान के अनेक विषय में ज्ञानार्जन आरंभ हुए । इस दौरान प्रा.डॉ.टी.के. पवार के बाद प्राचार्य गरुड, प्राचार्य चोपडे, प्रा. भगरे, प्रा.डॉ. संभाजी देसाई, प्राचार्य डॉ. जाधव, प्राचार्य वलेकर, प्रा. बर्गे, प्रा. डॉ. जाधव आदि ने अपनी अपनी ओर से महाविद्यालय का विकास किया, चाहे आवश्यक सुविधाएँ हो या फिर कॉलेज परिसर हो । शैक्षिक उन्नति तो उल्लेखनीय हो ही रही थी, छात्रों का सर्वांगिण विकास हो रहा था । सन २००३ में महाविद्यालय का नॅक की ओर से मूल्यांकन हुआ और C++ मानांकन मिला । कॉलेज विकास की दृष्टि से २००५ यह वर्ष विशेष महत्त्वपूर्ण कहा जा सकता है, क्योंकि इस वर्ष महाविद्यालय के भविष्य की दृष्टि से एक उमदा नेतृत्व महाविद्यालय को मिला । युवा शक्ति, कुशाग्र मति, चौकन्नावृत्ति, कुछ विशेष कर दिखलाने की वृत्ति तथा हम सब साथ है की प्रवृत्तिवाले प्राचार्य डॉ.सी.जे. खिलारेजी की नियुक्ति दहिवडी कॉलेज के प्रधानाचार्य पद पर हुई और कॉलेज के विकास में चार चाँद लग गये । शैक्षिक उन्नति विज्ञान शाखा में विविध नये विषय, शॉर्ट टर्म कोर्स, डिप्लोमा कोर्स, पी.जी. विभाग, संशोधन विभाग, पीएच्.डी. रिसर्च लॅब तथा कला और वाणिज्य शाखा में जैसे टॅली कोर्स, HRD Short Turm कोर्स, स्पोकन इंग्लिश, योगा कोर्स, ग्रामीण पत्रकारिता कोर्स जैसे अनेक अंशकालीन कोर्स का आयोजन कर छात्रों का सर्वांगिण विकास कर छात्र उन्नति का सफल प्रयास हो रहा है । सद्य: परिस्थिति में उपजीविका उपयोगी शिक्षा की महत्ता को विषद किया और छात्रों के लिए कॅम्पस इंटरव्ह्यू का आयोजन किया जा रहा हैं, अनेक छात्रों को इसका लाभ हो रहा हैं ।

सन १९६५ में आरंभ हुए इस महाविद्यालय में २००६ में पहला हिंदी एक दिवसीय सेमिनार आयोजित किया गया, तद्नंतर विश्वविद्यालयीन, स्टेट तथा नॅशनल सेमिनार का आयोजन किया जा रहा हैं । महाविद्यालय केवल छात्रों की दृष्टि से प्रगति पथ पर है सो बात नहीं । १९८४ में महाविद्यालय में अध्यापकों में केवल एक अध्यापिका प्रा.डॉ. आर.आर. मुल्ला पीएच्.डी. उपाधिधारक थी; किंतु आज कई अध्यापकोंने पीएच्.डी. उपाधि प्राप्त की हैं, वर्तमान में विश्वविद्यालय अनुदान समितीद्वारा अनुदान प्राप्त हो रहा हैं । महाविद्यालय के अध्यापक शोध कार्य में रत हैं । मायनर-मेजर प्रोजेक्ट कर रहे हैं । इस महाविद्यालय के अध्यापकोंका कार्यक्षेत्र केवल महाविद्यालय तक सीमित नहीं है । प्रा.डॉ.मुल्ला ने २००५-२०१० तक विश्वविद्यालय के हिंदी अध्ययन मंडल में प्रतिनिधित्व किया और अब प्राचार्य डॉ.खिलारे शि.वि.विद्यालय के विज्ञानशाखा के अधिष्ठाता रूप में कार्यरत है, यह महाविद्यालय का सन्मान है । महाविद्यालय की प्रगति मानो आकाश छूना समझ रही है ।

सच है समय ने इस कॉलेज को सफलता का वरदान ही दिया है, परीक्षा के नतीजे, छात्रों का विकास, आविष्कार शोधपत्रिका में राज्यस्तर तक पहुँचना, तथा छात्रों का आयुक्त पद तक पहुँचना आम बात नहीं हैं और भविष्य में निश्चित ही इस कॉलेज के छात्र देश में अपना नाम रोशन करेंगे । मुझे विश्वास हैं, यह कॉलेज भविष्य में एक विश्वविद्यालय का रुप धारण कर माणगंगा के लोगों को, छात्रों कों ज्ञानामृत से तृप्त करेंगा ।

फूले फले सदा ये महाविद्यालय,<br>
ये दुआ हैं हमारी ।<br>
महाराष्ट्र में ही नहीं,<br>
देश में नाम रोशन करे ।

जय कर्मवीर !

❑ ❑ ❑



Scanned with CamScanner

# मराठी विभाग

"भाषा हे आपलं केवळ सांस्कृतिक वैभव नाही, तर ते आपलं सांस्कृतिक भांडवल आहे आणि आर्थिक भांडवल बनण्याची त्याची क्षमता आहे. यापूर्वीच्या काळात पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, गणित या शास्त्रांच्या आधारे प्रगती झाली. तर या पुढच्या काळातले तंत्रज्ञानातल्या बदलांमध्ये भाषा हा मुख्य आधार ठरणार आहे. तुमच्याकडे असलेल्या विविध भाषा हे तुमचं महत्वाचं बलस्थान असेल. आपल्या बोलीभाषा याच आपलं बलस्थान ठरू शकतं आणि याच भाषा भारताला सुपरपॉवर करतील."

■ डॉ.गणेश देवी

पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया

■

विभागीय संपादक

**प्रा.एन.व्ही.शिंदे**

Scanned with CamScanner

# अंतरंग


- श्री.अरुण काकडे : रंगमंचाच्या पडद्यामागील दीपस्तंभ / कु.शहिनाज करीम पठाण / तृतीय वर्ष कला / १५
- पुरोगामी विचारसरणीची राष्ट्राला गरज / विकास राजाराम बनसोडे / तृतीय वर्ष कला / १७
- मला कळत नाही / निर्मला कदम / द्वितीय वर्ष वाणिज्य / १९
- भाकरीच्या शोधात... सिंधुताई / कु.अर्चना चंद्रकांत माने / तृतीय वर्ष वाणिज्य २ / २०
- मैदानाबाहेरील सचिन / कु.मयुरी भुजबळ / प्रथम वर्ष कला / २२
- रयत माझी माय / उदय नानासो मगर / प्रथम वर्ष विज्ञान / २४
- ॐकार ध्वनीची शक्ती... / कु.मयुरी आण्णा शेडगे / प्रथम वर्ष कला / २५
- फक्त तुझ्यासाठी / कु.ज्योती शामराव कदम / प्रथम वर्ष विज्ञान / २५
- जीवनातील सोनेरी क्षण / कु.वृषाली सोपान सावंत / प्रथम वर्ष कला / २६
- लढाई / अभिमन्यू पोपट सावंत / प्रथम वर्ष विज्ञान / २८
- कळी / अतुल शिंदे / प्रथम वर्ष कला / २८
- स्त्रीभ्रुणहत्या / राहुल हिंगमिरे / प्रथम वर्ष कला / २९
- माझं घर / सुजाता देवकर / तृतीय वर्ष कला / ३१
- शिक्षण म्हणजे.... ! / विकास राजाराम बनसोडे / तृतीय वर्ष कला / ३१
- शास्त्रज्ञ डॉ.होमी जहाँगीर भाभा / कु.स्वाती सोपान सावंत / तृतीय वर्ष वाणिज्य / ३२
- ग्रामीण भागातील स्त्रियांचा चिकित्सक अभ्यास / कु.वैशाली काटकर,कु.नम्रता पोळ / तृतीय वर्ष वाणिज्य ३३
- बेकारी / अमृत परशुराम बोराटे / तृतीय वर्ष कला / ३५
- जीवन हे असच जगायचं असतं / रेश्मा कृष्णराज सावंत / द्वितीय वर्ष कला / ३५
- लोकपाल / कु.कोमल लक्ष्मण देवकर / तृतीय वर्ष कला / ३६
- एक मुलाखत साहित्यिकाची / अमृत परशुराम बोराटे, सचिन सुर्यवंशी / तृतीय वर्ष कला / ३९
- मैत्री आणि प्रेम / रणजित संभाजी सुर्यवंशी / प्रथम वर्ष वाणिज्य / ४१




Scanned with CamScanner




# श्री.अरुण काकडे : रंगमंचाच्या पडद्यामागील दीपस्तंभ

कु.शहिनाज करीम पठाण, तृतीय वर्ष कला

■



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने ९४व्या 'अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर' श्रीयुत अरूण काकडे ह्यांची निवड केल्याबद्दल "natakmandali.com" कडून त्यांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !!! नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावर निवड बिनविरोध न होऊन, गेल्या पाच वर्षाची परंपरा खंडीत झाली असली तरीही लोकशाही मार्गाने त्यांची निवड म्हणजे त्यांनी गेली ६० वर्षे रंगभूमीला जे वाहुन घेतले ही रसिकांकडून दिलेली पावतीच म्हणायला काही हरकत नसावी !!!

मंदिराच्या कळसाकडे म्हणा वा पर्वताच्या शिखराकडे सर्वांचेच लक्ष असते, पण तो कळस वा ते शिखर ज्यांच्यावर उभे राहते, त्या पायाच्या दगडाकडे किती जणांचे लक्ष असते ? पुण्यात नातेवाईकांकडे राहून विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करता करता नाटके पाहण्याची आवड निर्माण झाली. (PDA) मध्ये दाखल झाले, १९५५ पर्यंत तेथे काही नाटके सुध्दा सादर केलीत पण १९५६ मध्ये नोकरीनिमित्त मुंबईस येणे झाले आणि ते 'मुंबईकर' झाले. शेवटी काय 'जेथे भरेल पोटाचा दरा, तो गाव माझा खरा !!!' मुंबईला आल्यानंतर विजयाबाई मेहता, अरविंद देशपांडे, विजय तेंडुलकर, माधव वाटवे यांच्याशी ओळखी वाढल्यात. काही बालनाट्ये सादर केली. यातुनच 'रंगायन' संस्थेची निर्मिती झाली. मध्यंतरीच्या काळात विजयाताई मेहता तीन वर्षे लंडन येथे जाऊन आल्या. आल्यानंतर पुन:श्च अशा काही घडामोडी झाल्यात की त्यातून 'आविष्कार' संस्थेने जन्म घेतला.

साधारणत: १९७१ मध्ये आविष्कारची स्थापना झाल्यानंतर नाटकांच्या तालमीसाठी जागा हवी होती. श्री अरूण काकडे यांची कामाची पध्दत अशी होती की जे काही करायचे, ते अगदी मनापासून आणि पूर्ण निष्ठेने ! सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांनी दैनंदिन कामे अंगावर घेतली. आपल्या 'अभिनेता' ह्या अनुभूतीला तिलांजली दिली आणि त्या ऐवजी स्विकारले ते ''व्यवस्थापन किंवा सुत्राधारत्व !!!''

नाटकांची संख्या कमी होत गेली, काही किरकोळ आविष्कार मात्र टिकून होते. रंगभूमीचे साहित्य शाळेत अरूण काकडे ते दिवस आठवतांना म्हणतात, ''निर्माता म्हणून किंवा व्यवस्थापक म्हणून माझी कामाची पध्दत अगदी ठरलेली असायची, कोणत्याही सहकाऱ्यांशी, मग तो माझ्यापेक्षा वयाने मोठा असो की लहान असो. भालबा केळकर, विजया ताई आणि अरविंद देशपांडे ही माझी आदरस्थाने होती. आज तेच अरूण काकडे ९४व्या भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. ''नाटक-मंडळी डॉट कॉम'' त्याचे पुन:श्च अभिनंदन !!!



Scanned with CamScanner

अरूण काकडे यांना संपूर्ण नाट्यसृष्टी ''काकडेकाका'' या नावाने आळखते. असा कोणताही लौकीक लाभ नसताना काकडे यांनी साडेतीन तपाहून अधिक काळ संस्थात्मक कार्याचा डोलारा कौशल्यानं सांभाळला. आधी 'रंगायन' आणि नंतर 'आविष्कार' या दोन्ही संस्थांचा उल्लेख प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात अग्रक्रमानं करावा लागतो. त्या संस्थांचं सुकाणू काकडेकाकांच्या हातात होतं.

**सुरूवातीचे दिवस :**

काकडेकाकांचा नाट्य व्यवसायाशी संबंध आला त्याला पासष्टहुन जास्त वर्षे लोटली. वडील तबलजी असले तरी घरी नाटकांचे संस्कार नव्हते. १९७१ साली 'आविष्कार'ची स्थापना झाली. अरविंद आणि सुलभा देशपांडे यांबरोबर तेंडुलकर, सत्यदेव दुबे हे ही होते. पण 'आविष्कार' मात्र गेली एकेचाळीस वर्षे सुरू आहे, हे या संदर्भात पुरेसं बोलकं आहे.

**आविष्कारांचा आधार :**

काकडेकाका संस्था चालवणे हा उद्देश डोळ्यांसमोर टेवून गेली साठ वर्षे कार्यरत आहेत. त्या काळात त्यांनी निर्मितीबरोबर प्रकाश योजना, सेट लावणे अशीही कामे केली. नाट्यसृष्टीतली चाळीस वर्षे काकडेकाका गेल्या अनेक दशकांपासून निरनिराळ्या लोकांसोबत काम करत आहेत. मुंबईत शेवटच्या गाड्यांचा विचार करून खात्री करीत. तेंडुलकरांनी लेखनात जे वैविध्य दाखवलं ते आजच्या नाटककारांत दिसत नाही. त्यांच्या अनुभवानुसार ते लिहतात. पण त्यांची ताकद मर्यादित आहे. चेतन दातार हा अलीकडच्या काळातला खूप काही करू पाहणारा नाट्यकर्मी होता. मला आज इतक्या वर्षानंतर वयाच्या ऐंशीव्या वर्षीही नवीन प्रयोग करायला आवडतात. करून पाहू असं माझं नेहमी म्हणणं असतं पण तसं ते या तरूण मुलांचं असतच असं नाही.''

'तुघलक', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'पाहिजे जातीचे', 'चांगुणा', 'गौराई', 'मिडीआ', 'रक्तबीज', 'सावल्या' अशा अनेक उत्तम नाटकांची निर्मिती 'आविष्कार' ने केली. छबीलदासच्या प्रवाहात अनेक हौशी-प्रायोगिक नाट्यसंस्था सामील झाल्या. त्यांना रंगपीठ उपलब्ध करून देण्याचे काम काकडेकाकांनी केले. त्या काळात प्रायोगिकवाल्यांनी त्यांना 'काका' ही उपाधी दिली. काकडे काकांनी मराठी रंगभूमीला दिलेल्या योगदानाची दखल घेऊन वयाच्या पंच्याहत्तरीत महाराष्ट्र सरकारने त्यांना सांस्कृतिक राज्य पुरस्कार देऊन सन्मानीत केले.

**कामावरची निष्ठा :**

इतक्या वर्षानी मनात काही खंत राहून गेली का ? असं विचारल्यावर काकडेकाका म्हणाले, ''सरकारने वेगवेगळ्या प्रयोगासाठी मदत केली पाहिजे, ती कर्तव्य म्हणून केली पाहिजे. इतक्या वर्षात इतके रंगकर्मी रभे राहिले पण माझ्यासारखं काम दुसऱ्या कुणी केलं नाही याचा विषाद वाटतो. एक नाटक केलं की आजच्या मुलांचा बायोडाटा तयार होतो. मी इतकी वर्षे या व्यवसायात आहे मात्र माझा बायोडाटा अजूनही तयार नाही.

काकडे काका एक नाट्य हजारो वर्षे प्रयोग व्यक्ती आहे. श्री.पु. भागवत, तेंडुलकर यांनी खूप आग्रह केला पण काकडेकाकांना ते जमलं नाही. मी ती ताकद शांत राहून मिळवतो. नाटक ही सतत करत राहण्याची गोष्ट आहे. मी हे गेल्या साठ वर्षांच्या अनुभवांतून शिकलोय. तेच राहवं एवढीच इच्छा आहे.''

■ ■ ■



Scanned with CamScanner




# पुरोगामी विचारसरणीची राष्ट्राला गरज

**विकास राजाराम बनसोडे**, तृतीय वर्ष कला

■



आपल्या भारतीय समाजाला पाच हजार वर्षापूर्वीचा इतिहास आहे. या काळात अनेक महापुरूष व संत होऊन गेले. गौतम बुध्द, संत कबीर, बसवेश्वर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगेबाबा, गोपाळ गणेश आगरकर, प्रबोधनकार ठाकरे, शहिद भगतसिंग यांनी समाजाला मानवतेचा व समतेचा विचार मांडून नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला.

जाती व्यवस्था, कर्मकांड, अनिष्ट प्रथा, रूढी, स्त्रीदास्यमुक्तता, अंधश्रध्दा, भ्रूणहत्या, देवदासी, लिंगभेद यांच्याविरूध्द आपआपल्या पध्दतीने लढा दिला. त्यांनाही त्या काळात विरोध झाला. त्याकाळात सुध्दा पुरोगामी व प्रतिगामी हे दोन प्रवाह समाजात होते, व ते आजही आहेत. कोणत्याही काळात समाजात हे दोन प्रवाह कार्यान्वित असतात. कोणत्याही काळात बुध्दीवंतांचा वर्ग हा फार कमी प्रमाणात असतो. पुरोगामी विरुध्द प्रतिगामी असा संघर्ष आजपर्यंत चालत आलेला आहे.

प्रतिगामी विचारसरणी म्हणजे अमानुष प्रथा, जातीव्यवस्था, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव, अस्पृश्यता, अमानवी कृत्य, देवदासी, जातपंचायत, लैंगिक शोषण, लिंगभेद, स्त्री-पुरूष असमानता, स्वर्ग, मोक्ष, आत्मा, वास्तुशास्त्र, ज्योतिषशास्त्र अशा काल्पनिक शक्ती गृहित धरून जगणे म्हणजे प्रतिगामी विचारसरणी होय. पुरोगामी विचारसरणी म्हणजे मानवता, समता, वैज्ञानिक दृष्टीकोन, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, सदाचार, नीती, सदविवेकबुध्दी, नैतिकता, बुध्दीवाद, सामाजिक बांधिलकी, चिकित्सक दृष्टीकोन, मानवी हक्क व मानवी स्वातंत्र्य ही पुरोगामी विचारसरणी होय.

आजपर्यंत जी समाजाची अधोगती झाली आहे. अंधश्रध्दाळू, अमानवी कृत्य, नरबळी, लैंगिक शोषण, जातीव्यवस्था, धर्मभोळेपणा, अज्ञान, दारिद्र्य, जातीय दंगली, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव हे चित्र आपणास समाजात पहावयास मिळते. ते केवळ प्रतिगामी विचारसरणीमुळेच निर्माण झालेले आहे. तसेच आपल्या राष्ट्रात औद्योगिक क्रांती उशिरा झाली. संख्यात्मकदृष्ट्या संशोधक व वैज्ञानिक कमी प्रमाणात निर्माण झाले. याचे कारण म्हणजे एका विशिष्ट वर्गाने बहुसंख्य लोकांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. मानवी हक्क व स्वातंत्र्यापासून अलिप्त ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर आजही समाजात सामाजिक व आर्थिक विषमता आहे. ही विषमतेची दरी कमी होण्यापेक्षा जास्तच वाढत चालली आहे. त्यामध्ये ५% लोकांकडे ९५% संपत्ती आहे व



Scanned with CamScanner

९५% लोकांकडे ५% संपत्ती आहे. हा विरोधाभास आजही समाजात दिसून येतो. याला प्रतिगामी विचारच कारणीभूत आहेत.

एक विशिष्ट वर्ग आर्थिक व राजकियदृष्ट्या प्रबळ असल्यामुळे साहित्य, कला, सिनेसृष्टी, जाहीराती, प्रसारमाध्यमे यांच्यावर अधिक प्रभाव आहे. जर तुम्ही टी.व्ही. चालू केला की बुवा, बाबाजीचे प्रवचन, ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र, वशीकरण, धनलाभ, कुबेरयंत्र, लक्ष्मीयंत्र इ. जाहिराती आपणांस पहावयास मिळतात. यांना कोणताही वैज्ञानिक आधार नाही. याला सुसंस्कृत व उच्चविद्याविभूषित असणारा वर्गसुध्दा बळी पडलेला आहे. हे समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने हानीकारक आहे. आजही समाजात धर्मांधता दिसून येते. विकासाचे व श्रमिक, शेतकरी, आदीवासी, नक्षलवादी, शोषितांचे अनेक ज्वलंत प्रश्न डावलून जातीयतेचे राजकारण केले जाते. व जातीय दंगली घडवून स्वत:चे राजकीय हित जपले जाते, व सत्तेची पोळी भाजली जाते. तसेच भाषावाद, प्रांतवाद, जातीयता व धर्मांधता पोसली जाते. हे प्रतिगामी विचार आपल्या राष्ट्रीय विकासाच्या धोरणात अडथळा निर्माण करतात. जातीयता, धर्मवाद, प्रांतवाद यामुळे राष्ट्रांचे तुकडे पडतील. यासाठी मानवतावादी व पुरोगामी विचाराची, विज्ञाननिष्ठा या विचारांची गरज आहे. धर्मासाठी प्राण देणारे अनेक जण या जगात तुम्हाला भेटतील. पण मानवतेसाठी लढा देणारे खूपच कमी भेटतील.

आपल्या राष्ट्रात प्रतिगामी विचारांची प्रवृत्ती वाढली तसे पुरोगामी विचारवंत व महापुरूषही जन्मत:च राहिले. गौतमबुध्द, संत कबीर, बसवेश्वर, महात्मा जोतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षि शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, गोपाळ गणेश आगरकर, प्रबोधनकार ठाकरे, शहीद भगतसिंग या सर्व महापुरूषांनी समाजप्रबोधन करून समाजातील आर्थिक सामाजिक व शैक्षणिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. ते सामाजिक न्यायासाठी लढले व समाजपरिवर्तन घडवून आणले. परंतु प्रतिगामी प्रवृत्तींनी आपले अस्तित्व टिकवण्यासाठी स्वार्थासाठी अनेक विचारवंतांची व संतांची हत्या घडवून आणली. तसेच पुरोगामी महापुरुषांची व संतांची चरीत्रे विकृत करून समाजासमोर मांडली आहेत. त्यांचा खोटा इतिहास लिहीला आहे. व समाजाची दिशाभूल केलेली आहे व आजही हा उद्योग चाललेला आहे.

फुलेंनी 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'शेतकऱ्याचा असूड', 'इशारा' या ग्रंथातून प्रतिगामी विचारसरणीवर कडाडून टिका केली आहे. प्रबोधनकार ठाकरेंनी 'धर्माची देवळे आणि देवळांचा धर्म' या ग्रंथात धर्मांधांनी देव व देवळांच्या माध्यमातून जनतेचे कसे शोषण केले आहे. याबद्दल आपले प्रखर विचार मांडले आहेत. शहिद भगतसिंग यांनी 'मी नास्तिक का आहे' या ग्रंथात ''ज्या दिवशी मानवी स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी आयुष्य वेचणाऱ्या मानसिकतेचे भरपूर स्त्री-पुरूष आपल्याला आढळतील, की जे मानवजातीची सेवा आणि पिडीत मानवाची मुक्ती याखेरीज दुसऱ्या कशाही करता आपले आयुष्य वाहून घेऊ शकणार नाहीत. तो दिवस मुक्तीच्या युगाची नांदी ठरेल.'' तसेच त्यांनी पुरोगामी विचारसरणी देशप्रेम, मानवतावाद, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, दैववादाचे खंडन केलेले आहे. असे विचार त्यांनी मांडले आहेत.

डॉ. आंबेडकरांनी प्रखर लढा देऊन घटनेच्या माध्यमातून सर्वांना सारखा न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे व एक निकोप, सुसंस्कृत, जातीविरहीत समाज घडवण्यासाठी अवघे आयुष्य वेचले. परंतु दुर्दैवाने घटनेची अंमलबजावणी योग्यरीत्या न झाल्यामुळे, सत्तेत धर्मांध व प्रतिगामी भांडवलदार वर्ग सत्तेत असल्यामुळे समाजातील आर्थिक, सामाजिक दरी अधिकच रूंदावली आहे. आज



Scanned with CamScanner

मानवतावादी पुरोगामी विचारांची व विज्ञाननिष्ठ विचारांची गरज आहे. परंतु दुर्दैवाने प्रतिगामी विचारांचा प्रसारमाध्यमांवर पूर्ण प्रभाव असल्यामुळे समाजात पुरोगामी विचार पोचत नाहीत.

फुले, शाहू, आंबेडकर यांच्यानंतर पुरोगामी चळवळीत पोकळी निर्माण झाली होती. ती भरून काढण्याचे काम काही समाजसुधारकांनी केले. त्यामध्ये संत गाडगेबाबा व प्रबोधनकार ठाकरे यांनी चांगले योगदान दिले. यांच्यानंतर पुरोगामी चळवळीचा प्रभाव कमी झाला. यानंतर पुरोगामी चळवळीला पुढे रेटण्याचे काम डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. श्रीराम लागू, डॉ. शाम मानव यांनी मोठ्या निष्ठेने केले. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी 'अंधश्रध्दा निर्मूलन समिती'च्या माध्यमातून अनेक भोंदूबाबांचे बिंग फोडले, देवदासीला विरोध केला, नरबळी व पशुबळी, जात पंचायत, वास्तुशास्त्र, ज्योतिषशास्त्र यांना विरोध केला. व आंतरजातीय विवाह घडवून आणले व पुरोगामी चळवळीला पुढे चालवण्याचे काम केले. तसेच जादूटोणा विधेयक मंजूर व्हावे यासाठी २० वर्षे पाठपुरावा केला. परंतु प्रतिगामी प्रवृत्तींनी त्यांची हत्या घडवून आणली. ही पुरोगामी महाराष्ट्रात अशी गोष्ट होणे म्हणजे खूपच लाजिरवाणी बाब आहे.

आपले राष्ट्र आर्थिकदृष्ट्या संपन्न, सुसंस्कृत व सक्षम व निकोप समाजनिर्मिती करावयाची असेल व जातीविरहीत समाज घडवण्यासाठी पुरोगामी विचारांची नितांत गरज आहे. तरूण पिढीने पुरोगामी विचारांचा वारसा घेऊन समाजपरीवर्तनाचे कार्य केले पाहिजे. तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचनसंस्कृती जोपासली पाहिजे. सामाजीक बांधिलकी, व्यक्तिगत कर्तव्ये, नैतिक मूल्ये, कौटुंबिक जबाबदाऱ्या, कर्तव्याची जाणीव, महापुरूषांच्या आत्मचरित्राचे वाचन, राज्यघटनेतील हक्क व कर्तव्ये, मर्यादा, वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मनिरपेक्षता इ. बाबी लक्षात घेऊन मानवतेच्या कल्याणासाठी लढले पाहिजे व समाजात 'मानवता' नांदावी यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

तरच भारत जगातील [illegible], सक्षम, विकसीत महासत्ता म्हणून उदयास येऊ शकेल.

■ ■ ■

## मला कळत नाही

मला एक कळत नाही,
फांद्या विलग-विलग होतात का ?
विलग व्हायचे होते तर,
एकाच बुंध्यापोटी जन्म घेतात का ?

मला एक कळत नाही,
खोल्या वेगवेगळ्या असतात का ?
वेगळ्याच असायच्या असतात तर,
एकाच छताखाली त्या बांधतात का ?

मला एक कळत नाही,
भाऊ-भाऊ भांडतात का ?
भांडायचे असेल तर,
एकाच आईच्या पोटी जन्म घेतात का ?



मला एक कळत नाही,
भारत पाकिस्तान भांडतात का ?
भांडायचे होते तर,
हिंदुस्तानच्या पोटी जन्म घेतलाच का ?

**निर्मला कदम**
द्वितीय वर्ष वाणिज्य



Scanned with CamScanner

व्यक्तिचित्रण

# भाकरीच्या शोधात... सिंधुताई

कु.अर्चना चंद्रकांत माने, तृतीय वर्ष वाणिज्य

■



जन्माला येणारा प्रत्येक जीव नाशवंत आहे. मृत्यू हा अंतिम टप्पा आहे. असं म्हणतात की, जन्मानंतरचा पहिला श्वास आणि मृत्यूपूर्वीचा शेवटचा श्वास या दोन श्वासातील अंतर म्हणजेच आमचं आयुष्य. या आयुष्याच्या वाटेवर आम्हाला हवं असलेलं, नको असलेलं जीवन जगावं लागतं. जीवनात काही व्यक्ती स्वत:पुरतं जगतात. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'जे फक्त स्वत:साठीच जगतात ते जिवंतपणे मृत असतात. मात्र जे इतरांसाठी जगतात ते मेल्यानंतरही जिवंत असतात. इतिहास अशाच व्यक्तीची नोंद घेतो. पण आपल्या हयातीत इतिहासाने नोंद घ्यावी अशा थोड्या व्यक्ती या जगात आहेत. समस्त मानव जातीला प्रेरणाशक्ती बनून या कृतार्थ जीवनाचा उपयोग दीन, दलित, दु:खी, पिडीत, निराधार यांना आश्रय देण्यासाठी या असामान्य व्यक्ती आपलं आयुष्य समर्पित करतात. अशा समर्पित आयुष्याचा शोध घेताना एक शोध लागतो तो अशा व्यक्तिमत्त्वाचा की जीनं आपलं आयुष्य अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जगलं, वेदना सहन केल्यात. त्या वेदनेतून हुंकार आला, 'जगा आणि जगू द्या, संघर्षावर मात करायला शिका, संकटांना घाबरून जावू नका, काटे बोचले तर सहन करायला शिका, कारण काट्यांना फक्त बोचणंच माहित असतं, वेदना कळत नसतात. अशा वेदनांचा वेध निर्माण करणाऱ्या आमच्या 'माई' अर्थात सौ. सिंधुताई सपकाळ.......अनाथांची माय.

समाजव्यवस्थेच्या बळी ठरलेल्या माई आज समाजाला आत्मबळ देऊन जगण्याची ऊर्जा देत आहेत. अनाथांची आई होताना स्वत:चं मातृत्व प्रथम दान कराव लागलं आहे. बेशुध्द अवस्थेत गाईच्या गोठ्यात मुलीला जन्म देऊन, त्या मुलीची जन्मनाळ स्वत:च्या हातांनी १६ वेळा दगड मारून अलग केली. एवढ्यावरच ही आई थांबली नाही; तर आईपण चुकू नये म्हणून मुलगी दगडूशेठ हलवाई देवस्थान, पुणे यांचेकडे दान केली. म्हणजेच स्वत: देवकीचे सत्व बाजूला सारून अनाथ मुलांना जवळ केलं. त्यांचा सांभाळ, संगोपन, संवर्धन करून अनाथांसाठी वेगळं विश्व निर्माण केले. नाथांच्या दुनियेत अनाथांना एक वेगळी ओळख दिली. म्हणून माई नेहमी म्हणतात, 'मला अनाथांची देवकी होता आलं नाही, पण यशोदा मात्र निश्चित झाले. अनाथांचे विश्व उभं करताना माईंचा संघर्ष अजूनही संपलेला नाही. अत्यंत महागाई आणि स्पर्धेच्या युगात या हजारो अनाथ मुला-मुलींचा सांभाळ करताना फार अथक परिश्रम घ्यावे लागतात. कोणतेही आर्थिक अनुदान उपलब्ध नसताना माईंच्या भाषणांतून म्हणजे 'आईच्या काळजातून' या हृदयस्पर्शी आत्मकथनांतून जो पैसा माईंच्या पदरात प्राप्त होतो, त्या प्राप्तीतूनच अनाथमुलांचा खर्च भागवला जातो. म्हणजे आधी



Scanned with CamScanner

भूतकाळात ३५ वर्षे रेल्वेस्टेशन, बसस्थानके, मंदिरे या ठिकाणी याचना करून कार्यभार, सेवाभाव जोपासला आणि आता वर्तमानात दररोज ५०० ते ६०० कि. मी.चा प्रवास अहोरात्र करून महाराष्ट्र आणि देशभर फिरायचे, गावोगावी स्वत:चे पणाला लावलेले आयुष्य, कर्मकहाणी, आत्मकथनातून त्यांच्यासमोर मांडायची..... 'जीद्द, आत्मविश्वास आणि ध्येयनिश्चितीची इच्छाशक्ती असेल तर जीवन जगता येते' हा जीवन जगण्याचा महामंत्र समाजाला द्यावयाचा, असा जीवनाचा प्रदीर्घ प्रवास सुरू आहे. या सत्कार्यातूनच माई, चिंधीच्या सिंधू आणि आता आम समाजाच्या 'माई' बनल्यात. त्याग, समर्पण, नि:स्वार्थवृत्ती आणि स्वत:पेक्षा इतरांसाठी काहीतरी सेवा देण्याची उत्कट इच्छा यामुळेच माईंना ऐवढं अनाथांचे अद्भूत विश्व उभं करता आलं आहे. या विश्वाची महान माता माई म्हणतात, 'मी माई झाले अनाथांची...... तुम्ही गणगोत व्हा....... ज्यांचे कोणीही नाही त्यांची मी आई झाले.... तुम्ही माझं सरकार व्हा ना......' या माईंच्या सामाजिक आव्हानातून अर्थ अभिप्रेत होतो.... तो असा की, आपणही समाजाचे काहीतरी देणं लागतो. त्या सामाजिक जाणिवेतून माईंच्या या सेवाभाव जपणाऱ्या महान कार्याला हातभार लावावा.

राष्ट्रपती पुरस्कार आणि अन्य सामाजिक संस्थांचे सुमारे ७५० पेक्षा जास्त पुरस्कार प्राप्त होऊनही माईंची भटकंती थांबलेली नाही. पुरस्कार हे कार्याला सलाम आहेत परंतु पुरस्काराने भाकरी मिळत नाही. भाकरीच्या शोधात कष्टमय यातना सहन करून फिरावच लागतं. 'गाण्यानं मला खाणं दिलं. आता भाषणं करते म्हणून राशन मिळतं', असं माईचं म्हणणं आहे. या अथक परिश्रमपूर्ण प्रवासात माईंनी १४ नोव्हेंबर २०१३ रोजी वयाची ६५ वर्षे पूर्ण करून ६६व्या वर्षात पदार्पण केलं आहे. १४ नोव्हेंबर तसा बालदिनच. अनाथ मुलांसाठी आयुष्य वेचणाऱ्या या माईंचा वाढदिवस पुणे येथे अनाथ मुलांनी साजरा केला. या भावस्पर्शी वाढदिवसाच्या दिवशी अनाथ मुले माईंचे औक्षण करतात आणि त्या विधात्याकडे आळवणी करतात..... 'परमेश्वरा आम्हांला कोणी-कोणी नाही, बरं का ही एकच आई आहे. बर कां या आईला आमच्यासाठी उदंड आयुष्य दे. आमच्या मातृत्वाचा, वात्सल्याचा निर्मळ झरा अखंड वाहू दे.' या अनाथांच्या प्रार्थनेसोबत आपण सर्व मिळून प्रार्थना करू या, 'माई तू अनाथांची आई आहेस आणि आमची माई आहेस. माई या शब्दातही 'मा' म्हणजे आई, ई या शब्दात आईचा 'ई' समाविष्ट आहे. माई तुमच्या भाकरीच्या शोधात आम्हांलाही वाटसरू होऊ देत. या संघर्षमय प्रवासात तुमची वेदना ही आमची वेदना आहे. म्हणून अनेकांच्या वेदनांना जपत, फुंकर घालत व्यतीत होत असलेलं तुमचं आयुष्य वेदनारहित व्हावं, हीच शुभ कामना...

■ ■ ■

एकटेपणाच्या उन्हात फिरुन मन बिचारं खूप थकलं,
डोळे न पुसता रडत-रडत आठवणींच्या उन्हात बसलं,
मन आणि नशीब यांच्यात कोणत्याच प्रकारचं नातं नसतं
नशीबात जरी कुणी नसलं तरी मन मात्र त्याचीच वाट पाहत असतं

**कु.राणी अवघडे**
**प्रथम वर्ष वाणिज्य**



Scanned with CamScanner

# मैदानाबाहेरील सचिन

कु.मयुरी भुजबळ, प्रथम वर्ष कला



क्रिकेट विश्वातील प्रत्येकाच्या गळ्यातील ताईत असणारा आणि भारतीयांच्या देव्हाऱ्यात जागा मिळवणाऱ्या या क्रिकेटच्या मैदानातील एका हिऱ्याच्या निवृत्तीने सारे क्रिकेटविश्व हळहळले. पण हा ११ वर्षाचा सचिन देव कसा झाला ? तो एक चांगला खेळाडू आहेच यात तिळमात्र शंका नाही पण तो एक व्यक्ती म्हणून कसा आहे ? त्याने अवघ्या २४ वर्षात पूर्ण देशच नव्हे अख्खे जग सचिनमय केले आहे.

सचिनच्या मोठेपणाची चर्चा करताना आपण नेहमीच त्याच्या मैदानावरील कामगिरीचा विचार करीत असतो. तो विचार महत्वाचा आहेच. पण त्याचबरोबर या कामगिरीस साह्यभूत असे जे सचिनचे स्वभावचारित्र्य आहे तेही महत्वाचे आहे. सचिन जेव्हा कसोटी खेळायला पश्चिम बंगालमध्ये गेला होता, तेव्हा संघटनेने त्याचे खूप मोठ्या प्रमाणात स्वागत केले. सचिन तेथे खेळण्यासाठी आला आहे याचाच विसर त्या बंगालच्या मंडळींना पडला असावा म्हणून ते त्याच्या स्वागतात रमून गेले होते. अखेर सचिनला "मी खेळापेक्षा मोठा नाही, संघात आणखीही १४ खेळाडू आहेत" असे त्या संघटनेला सांगावे लागले. नंतर संघटनेने समारंभ आवरता घेतला. सचिनने काही कार्यक्रमांना जाणे टाळले. फक्त खेळाडूच नव्हे तर सर्व सेलेब्रिटी बनू पाहाणाऱ्यांनी धडा घ्यावा असा हा प्रसंग आहे.

केवळ खेळावर लक्ष केंद्रित करता यावे यासाठी आपल्या सन्मानार्थ कार्यक्रमांना न जाण्याचा निर्णय खरंच कौतुकास्पद आहे. त्याच्या याच निर्णयक्षमतेच्या जोरावर त्याने पूर्ण जगाला सचिनमय बनवून ठेवले. आंतरराष्ट्रीय बॉक्सिंगपटू मेरी कोम म्हणतात की, "त्याच्याकडे कमालीचा विनय आहे आणि नेहमीच तो विनम्रपणे वागतो. जगातील सर्वोत्तम खेळाडूंमध्ये त्याला स्थान असले तरी, त्याचे पाय अजूनही जमीनीवरच आहेत." सचिन नेहमीच स्वतःला विद्यार्थी समजतो. आपल्यापेक्षा लहान खेळाडूंशी मैत्री आणि मोठ्यांचा आदर करतो. त्याच्या याच वृत्तीमुळे त्याने प्रत्येकाच्या हृदयात जागा निर्माण केली आहे. सचिन एक असा तारा आहे जो खूप उंच असूनही त्याने मातीशी नातं कायम ठेवलं. सचिनची लहानपणापासून इच्छा होती भारताकडून खेळण्याची, त्यानंतर कसोटी क्रमवारीत अव्वल स्थान पटकावण्याची, विश्वविजयाची आणि आयपीएल विजेतेपद पटकावण्याची. ही सर्व स्वप्नं त्याने पाहिली आणि साकारली. तो प्रत्येक स्वप्न जगला. याला कारण म्हणजे त्याची तीव्र इच्छाशक्ती.

१६ मार्च २०१२ या दिवशी मास्टर-ब्लास्टर सचिनने उद्‌गार काढले होते, 'खेळाचा आनंद लुटा. स्वप्ने पहा, त्याचा पाठलाग करा, ती साकार होतात.' आणि त्याने ती करूनही दाखवली. तो मैदानावर

खेळत असला की प्रत्येकाला स्फुरण येत असे. सगळं काही व्यवस्थित सुरू आहे या अवस्थेत जाऊन प्रत्येकजण स्वत:चं दु:ख विसरत होता आणि आपल्या लाडक्या सचिनच्या खेळात मंत्रमुग्ध होत होता. फक्त भारतीयच नव्हे तर इतरही देशाच्या खेळाडूंचा तो मित्र आहे. सचिन ज्या-ज्यावेळी मॅन ऑफ द मॅच किंवा मॅन ऑफ द सेरीज म्हणून गौरवला गेला त्या-त्या वेळी त्याचा सन्मान म्हणून त्याला शाम्पेन किंवा वाईनची बाटली देण्यात आली. जल्लोषात येऊन ते पिणं तर सोडाच पण सचिनने ते कधी उडवलेही नाही. व्यसनाधीनतेचा भयंकर तिटकारा असणारा हा खेळाडू. आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्वाने त्याने प्रत्येकाची मने जिंकली आणि तो प्रत्येकाच्या हृदयाच्या कोंदणातला हीरा बनला.

सचिनच्या व्यक्तिमत्वाचा दाखला देताना एक प्रसंग नमूद करावासा वाटतो. सचिनची मुलगी सारा लहान असताना तिला खूप ताप झाला होता. सचिन तिला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाताना त्याची गाडी मध्येच चाहत्यांनी अडवली आणि गाडीभोवती गर्दी केली. सचिनच्या सोबत असलेला मित्र वैतागून पोलिसांना फोन फिरवू लागला, सचिनने त्याला थांबवलं आणि म्हणाला, ''मी पटापट स्वाक्षऱ्या करतो मग आपण लगेच निघू.'' त्याने हसतमुखाने सर्वांना स्वाक्षऱ्या दिल्या. स्वत:च्या मुलीइतकंच चाहत्यांनाही महत्त्व देणारा आणि त्यांची कदर करणारा सचिन हा खरचं महान आहे.

सचिनच्या मित्रांचही त्याच्याबद्दल खूप वेगळं आणि निरागस मत आहे. ते म्हणतात, ''सचिन एक मित्र म्हणून तसा हळवा आहे, त्याच्यामध्ये अजूनही आपुलकी, जिव्हाळा आहे, कधी भेटलो तर तो समोरून हात दाखवतो, आपण महान क्रिकेटपटू आहोत हे त्याच्या मैत्रीच्या आणि मित्रांच्या कधीही आड आलेले नाही. क्रिकेटमध्ये त्याने अनेक शिखरे गाठलेली असली तरी त्याचे पाय अजूनही तसेच जमिनीवर आहेत. पण आमच्यात थोडासा बदल झाला आहे. आम्ही सुरुवातीला त्याला तेंडल्या बोलायचो, त्यानंतर सचिन आणि आता 'मास्टर' म्हणतो'' त्याचे मित्र सांगतात तो अतिशय लाजाळू आणि स्वत:हून फार कमी बोलतो. त्याला जास्त बोलताना संकोच वाटतो. सचिन हा जेवणाचा खूप शौकीन आहे. त्याला मांसाहारी जेवण खूपच आवडते. 'खेकडे' हा त्याचा आवडता पदार्थ आहे. तसेच बिर्याणी, मासे खाण्याचा तो शौकीन आहे. एकदा सचिन आणि माजी क्रिकेटपटू सलिल अंकोला यांनी ७५ खेकडे फस्त केले होते आणि राहिलेल्या खेळाडूंना फक्त रस्यावर समाधान मानावे लागले होते.

सचिन त्याच्या शेवटच्या कसोटीच्या भाषणात आपल्या मित्रांबद्दल बोलतो, 'लहानपणी मला फार मित्र होते. त्यांचे मला इथपर्यंत पोहचवण्यात फार मोठे योगदान आहे. जेव्हा मी त्यांना सरावासाठी गोलंदाजी करायला सांगायचे तेव्हा ते नेहमी यायचे. मला साथ द्यायला ते त्यांची कामे सोडून यायचे. जेव्हा मी दुखापतग्रस्त होतो आणि सकाळी उठायचो कारण रात्रभर झोप यायची नाही आणि जेव्हा दुखापतीमुळे कारकीर्द संपेल असे वाटत होते. तेव्हा पहाटे तीन वाजता उठून फिरवायचे आणि कारकीर्द संपली नसल्याचा विश्वास द्यायचे. या साऱ्या मित्रांशिवाय आयुष्य संपूर्ण होऊ शकत नाही.

सचिन त्याच्या कुटुंबाबद्दल सांगताना अतिशय भावूक होतो. त्याला त्याचे वडील म्हणत असत, ''तू तुझी स्वप्नं गाठली पाहिजेत. पण त्यासाठी कोणताही जवळचा मार्ग शोधू नकोस, तुझा मार्ग खडतर असेल पण माघार घेऊ नकोस. इतर काही बनण्यापेक्षा तू चांगला माणूस बन.'' सचिन म्हणतो, ''मैदानात चांगली कामगिरी केल्यावर मी आकाशात बॅट दाखवायचो ते माझ्या बाबांसाठी.'' तो त्याच्या आईबद्दल सांगताना म्हणतो, ''ती अतिशय संयमी आहे. माझा खेळ चालू असताना देवापुढे प्रसाद ठेवायची आणि उपवास करायची.' सचिनच्या



Scanned with CamScanner

आयुष्यातली पहिली बॅट त्याला त्याच्या बहिणीने म्हणजे सविताने दिली. सचिनचा भाऊ अजित बद्दल बोलताना सचिन म्हणतो, 'हे संपूर्ण स्वप्न आम्ही दोघं मिळून जगलो. तो एक असा व्यक्ती आहे, की ज्याने स्वत:च्या क्रिकेट कारकिर्दीचा माझ्यासाठी त्याग केला.'

सचिनची पत्नी अंजली म्हणजे 'सचिनशिवाय क्रिकेट असू शकतं पण क्रिकेटशिवाय सचिन ही कल्पनाच माझ्यासाठी अशक्य आहे.' सचिन हा आधी क्रिकेटचा आहे, त्याच्या तमाम चाहत्यांचा आणि देशाचा आहे आणि मग आमचा आहे. सचिन अंजलीबद्दल बोलताना म्हणतो, 'अंजली एक डॉक्टर आहे, तिच्यापुढे फार चांगली कारकीर्द होती मी क्रिकेटविश्वात दंग असताना मागील कुटुंबाची जबाबदारी स्वत:वर घेत तिने मला सांगितले, 'तू तुझे क्रिकेट कायम ठेव कुटुंबाची सर्व जबाबदारी मी स्विकारते.' तिच्या याच पाठींब्यामुळे मी मुक्त आणि निश्चिंतपणे दडपणाशिवाय क्रिकेट खेळू शकलो.

सचिनने आपल्या निवृत्तीच्या भाषणात संघाला एक संदेश दिला. तो म्हणाला, ''आपण भारतीय संघाचे एक भाग होऊ शकलो आणि त्याचा आपल्याला अभिमान असायला हवा आणि देशसेवा करायला हवी.'' आपल्या देशाची देशसेवा सचिनने खरंच मनापासून केली. २४ वर्षांच्या कारकिर्दीत त्याच एकाही खेळाडूबरोबर भांडण झालेले नाही. कोणत्याही वादात अथवा गैरवर्तनात सचिन सापडला नाही.

निवृत्त होताना हळहळणाऱ्या प्रत्येक हृदयाचा ठोका अन् ओघळणाऱ्या प्रत्येक पापणीतील अश्रू सचिनबद्दलच्या प्रेमाची साक्ष देत होता. सचिन एक शहेनशहा आहे ज्याने प्रत्येकाच्या हृदयात घरच नव्हे तर महल [illegible]

परींदोंकी तरह सोचोगे
तो पिंजरे में रहोगे......

सोचो शहेनशाहकी तरह
तो महेल बनाओगे..

सचिनबद्दल बोलताना शब्दच नव्हे तर लेखणी सुध्दा अपुरी पडावी असा सचिन पुन्हा धरतीवर होणे नाही.

■ ■ ■

## रयत माझी माय

रयत माझी माय, जशी दुधावरची साय,
म्हणूनच समाजामध्ये मला कोणाची भीती नाय.

कर्मवीर अण्णांनी घेतले
रयतेला वाहून,
माता लक्ष्मी आल्या,
त्यांच्या मदतीला धाऊन.



एवढा मोठा लाविला हा वृक्ष,
पसारा त्याचा मावेना,
पसाऱ्याच्या छायेविना जीव माझा रमेना,
अण्णा जीव माझा रमेना.

अण्णांचे कार्य हे महान,
माता लक्ष्मींनी राखला त्यांचा मान
दोघांनीही पटकाविले,
माझ्या हृदयाचे स्थान.

अण्णा झाले महान, त्यांचे
एकची निशाण, ज्यांनी
मंगळसूत्रही ठेविले गहाण.

कळीतुनी फुले उमलली, तशी
रयतेतूनी मुले उमलली,
कर्मवीर अण्णांनी अशी,
मोत्यांची माळ गुंफली.

उदय नानासो मग
प्रथम वर्ष विज्ञा



Scanned with CamScanner

# ॐकार ध्वनीची शक्ती...

कु.मयुरी आण्णा शेडगे, प्रथम वर्ष कला

■




ॐ ही ध्वनीची शक्ती आहे. जगामध्ये पहिल्यांदा उत्पन्न झाला तो ध्वनी ॐकार होय आणि त्यापासून सगळे जग उत्पन्न झाले; म्हणून कुठलाही मंत्र ॐकाराचा प्रणव लागल्याशिवाय सिद्ध होत नाही.......

...... आणि म्हणून मंत्र कसा असावा, कुणी म्हणावा, कुणी द्यावा, त्याला काही अर्थ असतो. कारण परमेश्वराकडून पहिली प्रकटलेली शक्ती..... आवाजाची शक्ती, ध्वनीची शक्ती ॐकारापासून नानाविध स्वरव्यंजने निर्माण झाली.



ॐकाराचे 'अ, ऊ आणि म' हे तीन ध्वनी आणखी आहेत. 'अ' आणि 'ऊ' हे स्वर आहेत तर 'म' ही ध्वनीची शक्ती आहे. हे ध्वनी, आहे. हा जो पहिला ध्वनी उत्पन्न झाला त्याच्यापासून इतर सर्व ध्वनी निर्माण झाले. त्यामुळे मूळ ध्वनी जो ॐ त्याच्यापासून निर्माण झालेले हे सर्व ध्वनी, सर्व सूर व व्यंजने यांनाही देवताच मानले जाते. नुसते मानले गेले नाही तर ते देवता स्वरूपच आहे. ज्याप्रमाणे ॐ हे दैवत स्वरूप आहे. त्याचप्रमाणे ॐकारापासून उत्पन्न झालेली सगळी अक्षरे ही त्याचीच लेकरे आहे त्यामुळे ती दैवते आहेत.

श्री. सद्‌गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज नाम हे सत्वस्वरूप आहे. या प्रवचनात म्हणतात की अनेकात एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणा'चा गुण आहे म्हणजे सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे' आणि निर्जीव वस्तू झाली तरी ती 'आहे'. एवढेच काय पण आनंदाला सुध्दा 'आहेपणा'चा गुण आहे. या असणेपणाच्या गुणाला 'नाम' म्हणतात. यालाच ॐकार असे म्हणतात. ॐकारातून सर्वसृष्टी उगम पावली. ॐ हे परमात्म्याचे स्वरूप आहे.

वेदांच्या मंत्राचा आरंभ ॐकारानेच होतो, हेही विसरून चालणार नाही.

■ ■ ■

## फक्त तुझ्यासाठी

आयुष्य असेच सरते, धावत आठवणींच्या पाठी,
संबंध आयुष्य वाट पाहिली, मी फक्त तुझ्यासाठी....
तुझ्या येण्याची वाट पहात, शब्द गोठले अन् ओठी
हृदयात दुःखाचे भास कवळले, मी फक्त तुझ्यासाठी..
जगले असे की मी, जगणे राहून गेले पाठी
डोळ्यातले अश्रू हृदयात कोंडले,
मी फक्त तुझ्यासाठी....
हर घडी तुझ्या प्रेमाची, मनात ठेवली आस मोठी,
त्या आशेवर जगत राहिले, मी फक्त तुझ्यासाठी
तुझ्याच समोर झुकते मन,हे मन ही आहे फार हट्टी
याच हट्टावर आयुष्य बेतले, मी फक्त तुझ्यासाठी....

ज्योती शामराव कदम, प्रथम वर्ष विज्ञान



Scanned with CamScanner

# जीवनातील सोनेरी क्षण

**कु.वृषाली सोपान सावंत,** प्रथम वर्ष कला




■



''जीवन संघर्षात खूप काही करायचं असतं,
आपलं वेगळेपण दाखवायचं असतं,
हरूनसुध्दा पुन्हा एकदा जिंकायचं असतं.
आणि हार जीत जीवनाचंच नाव असतं.''

खरंच जीवन जगताना माणसाला वेगवेगळ्या प्रकारे अनुभव येतात. काही अनुभव हे सुखद असतात, तर काही अनुभव हे दुःखद असतात. परंतु जीवनात असेही क्षण असतात की ते क्षण आपण आयुष्यभर विसरू शकत नाही. असाच ''माझ्या जीवनातील एक सोनेरी क्षण'' तो सोनेरी दिवस अजूनही माझ्या मनपटलावर जसाच्या तसा उभा राहतो. तो म्हणजे मी डी.टी.एड.च्या प्रथम वर्षात असताना आमच्या सरांनी आम्हाला सांगितले की, तुमच्या रस्सीखेचच्या स्पर्धा होणार आहेत. त्यावेळी मी माझी तयारी दर्शवली आणि सरांनी माझं नावही घेतले. काही दिवसांनी आम्ही हुतात्मा परशुराम विद्यालय वडूज येथे स्पर्धा खेळलो. या स्पर्धेमध्ये आमचे कॉलेज म्हणजे 'संतकृपा कॉलेज' उपविजेता झाले.

दोनच दिवसांनी आम्हाला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यासाठी बोलावण्यात आले. आणि आमच्या कॉलेजमधील काही मुलींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धा म्हटल्यानंतर प्रॅक्टीस ही पाहिजे त्यातून ही स्पर्धा होती राज्यस्तरीय. राज्यस्तरीय स्पर्धा असल्यामुळे सराव करणे भागच होते. आणि त्याचवेळी आमच्या कॉलेजमध्ये परीक्षाही चालू होत्या आम्ही मुली पेपर संपल्यानंतर या खेळाचा सराव करत होतो. त्यावेळी आम्ही विद्यार्थी आणि खेळाडू असा दोन्हीही भूमिका साकारत होतो. आमच्या परीने आम्ही चांगल्या प्रकारे खेळण्याचा प्रयत्न करत होतो.

अखेर उजाडला तो दिवस एकदाचा. आम्ही सहभागी झालेल्या सर्व मुली होस्टेलच्याच असल्याने आमची धावपळ सुरूच होती. आमच्या स्पर्धा या म्हाळुंगे (बालेवाडी) येथे होत्या. आतापर्यंत या स्टेडियमबद्दल ऐकलं होतं आणि आता त्या स्टेडियमवर मी खेळायला जाणार आहे. खरं तर खूप आनंद झाला होता. परंतु असेही वाटत होते की आपला या स्पर्धेत टिकाव लागेल का ? तसं पाहिले तर ही स्पर्धा मी खेळले अनुभवासाठीच. स्पर्धेच्या आदल्या दिवशी जिल्ह्यातील सर्व मुलींना शाहू स्टेडियम, सातारा येथे एकत्र बोलावले व आमचे संघ पाडण्यात आले. मी माझ्या मैत्रिणीपासून अलिप्त झाले. कारण आम्ही सर्वच जणी वेगवेगळ्या संघात गेलो. संघ पाडल्यानंतर आम्ही बालेवाडीला जायला निघालो. काही तासातच आम्ही बालेवाडीला पोहोचलो. ते दिवस पावसाळ्याचे होते. त्यामुळे जिकडे तिकडे चिकचिकच होती.



Scanned with CamScanner

स्पर्धेचा दिवस आला. वरून मेघराजा बरसत होता आणि आमच्या खाली स्पर्धा चालल्या होत्या. जणू काही आमचं आणि पावसाचं भांडणच चाललं होतं. १६ जुलै रोजी दुपारी आमच्या स्पर्धा सुरू झाल्या. आमचा संघ जेव्हा मैदानावर उतरला तेव्हाही पाऊस सुरूच होता. आमच्या अगोदर काही स्पर्धक याच मैदानावर खेळले होते. त्यामुळे या मैदानावर दलदल झाली होती. या मैदानावर पाय ठेवायचा म्हटलं तरी कधी घसरून पडेल याचा नेम नव्हता आणि अशा मैदानावर आम्ही खेळत होतो, या स्पर्धा इनडोअर आणि आऊटडोअर अशा दोन प्रकारच्या होत्या. मी खेळले होते आऊटडोअरमध्ये आणि साहजिकच आऊटडोअर स्पर्धा या पावसात सुरू होत्या. खेळासाठी जी रस्सी होती ती पूर्णपणे चिखलाने बरबटलेली होती. त्यामुळे ती सटकण्याची शक्यता ही जास्त होती. रस्सी ओढताना खाली घसरून पडले तरी चालेल, परंतु रस्सी सोडायची नाही कारण रस्सी सोडल्यानंतर फाऊल धरायचे. रस्सी ओढताना मीही घसरून पडले. परंतु मी रस्सी सोडली नाही. अखेर आम्ही फायनलला पोहोचलो. संध्याकाळ झाल्यामुळे आमच्या स्पर्धा या दुसऱ्या दिवशी म्हणजेच १७ जुलैला झाल्या. आमची फायनल ठाणेविरूध्द झाली. खरं म्हणजे स्पर्धा आमच्या हातून गेली होती. परंतु शेवटच्या दोन मिनिटात आम्ही सर्वांनी एकवटून रस्सी ओढल्यामुळे स्पर्धा आमच्या हातात आली आणि आमच्या संघाला सुवर्णपदक मिळालं. मला स्वप्नातही वाटलं नव्हतं की मला सुवर्णपदक मिळेल.

सर्व स्पर्धा संपल्यानंतर संध्याकाळी आमचा बक्षिस वितरण समारंभ होता. तसं पाहिलं तर त्या दिवशी माझ्यावर अभिनंदनाचे वर्षावच होत होते. माझ्या क्रिडाशिक्षकांना म्हणजेच साठे सरांना (एनआयएस कोच पतियाला) तर खूपच आनंद झाला होता. तो त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होता. माधवी पाटील मॅडम यांच्या हस्ते सर्वांना मेडलही देण्यात आले. सुवर्णपदक असल्यामुळे आमच्या संघाचे नाव शेवटी होते. ज्यावेळी सुवर्णपदक माझ्या गळ्यात घातलं त्यावेळी इतका आनंद झालेला की, तो शब्दांत मांडणे कठीणच. सत्कार झाल्यानंतर मी माझ्या जागेवर गेले, तेथे गेल्यानंतर मी सरांच्या पाया पडले व माझ्या गळ्यातील मेडल मी सरांच्या गळ्यात घातले. आमच्या पाठीमागे बसलेल्या लोकांचं लक्ष आमच्याकडे होतं ते मला कळलंच नाही. मी सरांच्या गळ्यात मेडल घातल्यानंतर सर्वांनी टाळ्यांचा कडकडाटच केला होता. त्यावेळी सरांच्या डोळ्यात आलेले आनंदाचे अश्रू मी पाहिले. सरांना झालेला आनंद ते शब्दांत सांगूच शकत नव्हते ते त्यांच्या अश्रूंनी सांगितले होते. त्यावेळी सरांनी काढलेले एक उद्‌गार मला आठवले, 'आपलं आणि परकं यातला फरक काय असतो, ते मला आज कळलं.' संध्याकाळी जेवून निघताना आम्हाला एक मुलगी दिसली. त्या मुलीला पाहिल्यानंतर मला असं वाटलं, या मुलीला मी कोठेतरी पाहिले आहे. नंतर माझ्या लक्षात आलं की, अरे ही तर तेजस्विनी सावंत आहे. जीला आपण टि.व्ही.वर पाहतो. ती तेथे प्रॅक्टीससाठी आली होती. आपण एवढ्या मोठ्या स्टेडियमवर खेळलो याचा खूप आनंद होत होता.

कॉलेजमध्ये गेल्यानंतर सर्वांकडून अभिनंदनाचे वर्षावच होत होते. अध्यक्षांच्या हस्ते माझा सत्कारही करण्यात आला. हा माझ्यासाठी एक आनंदाचा धक्काच होता.

काही दिवसांनंतर आमच्या सरांनी राष्ट्रीय स्तरावर कुस्तीमध्ये सुवर्णपदक मिळवले. सरांना सुवर्णपदक मिळाले म्हणून मी सरांचं अभिनंदन करण्यासाठी गेले. तेव्हा मी अभिनंदन केलेही. सरांनी मला विचारलं कशाबद्दल ? मला सरांचं आश्चर्य वाटलं, की एवढं मेडल मिळालं असतानाही सरांना किंचित गर्व नव्हता. त्यावेळी सर मला म्हणाले, 'हे मेडल फक्त तुझ्यामुळे मिळाले.' सरांच्या तोंडून हे उद्‌गार ऐकून मी सुखावलेच. खरंतर सरांनीही क्रिडाक्षेत्रात खूप नाव मिळवले होते परंतु त्यांना



Scanned with CamScanner

त्यावेळी सर्टीफिकेट किंवा ट्रॉफी दिली जायची. सरांना मेडल पाहिजे होते. सर मला म्हणाले, 'तुला गोल्ड मेडल मिळाले, मग मी ही मनाशी विचार केला की मी ही मेडल मिळवणारच. राष्ट्रीय स्पर्धा खेळल्यानंतर सरांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी सरांची निवड झाली. या स्पर्धा श्रीलंकेमध्ये झाल्या होत्या. या स्पर्धेत आमच्या सरांना 'ब्रॉंझ'मेडल मिळालं. आणि सरांच्या हातात भारताचा झेंडा आला. आम्हा विद्यार्थ्यांसाठी खूप आनंदाची गोष्ट होती ती.

खरंच सरांमुळे माझ्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. मग ते माझ्या माध्यमिक शाळेतले असोत किंवा कॉलेजचे. ते सदैव माझ्यासाठी प्रेरणादायी आहेत.

■ ■ ■

## लढाई



छे ! नक्कीच केला असेल,
कुणीतरी यशस्वी जादूटोणा
त्या तरूण माथेफिरूवर
अन्यथा मेंदू शाबूत असता तर
त्याने झाडलीच नसती
एकही गोळी नरेंद्रावर
त्यानेही बंद पाडले असते थोतांडांचे अभियान.
पण जेव्हा पुरोगामीत्व कोसळते रक्ताच्या थारोळ्यात.
तेव्हा श्रध्देच्या पाखरांच्या पंखावर असते अंधश्रध्देची राख.
आणि तडफेने झेपावणारी पाखरं पराभूत होऊन
कर्मकांडाच्या वळचणीला आसरा घेतात.
प्रत्येक शतकात हे रक्ताचे थारोळे इतिहास बनले आहे.
एकीकडे उजळतांना वर्धमान होताना
नव्या परिमाणांचे बुध्दीगम्य क्षितीज.
एक बंदुकही लखलखते नव्या सुडाने.
एका क्षणात माणुसकीचा आवाज गोठवून टाकणारा
गोळीचा आवाज.
अडवू शकतो काही काळ समाज सुधाराचा प्रवाह
पण नव्या जोमाने जन्माला येतच असते
नव्या माणसाचे अभियान.
तोपर्यंत बांधून ठेवायला हवेत हे काळी जादू झालेले मेंदू
शतकानुशतके चालत आलेली ही लढाई
नव्या अभिसरणांची खंबीर अस्त्रांनी पुढे चालू ठेवायला हवी.
माणूस संपविण्याची ही विकृत चाल
ज्या बंदूकीने लिहली ती बंदूकच नष्ट करायला हवी.
प्रखर विचारांची शस्त्रे अजून धारदार करायला हवीत !

**अभिमन्यू पोपट सावंत**, प्रथम वर्ष विज्ञान

## कळी

एक गुलाबकळी पाकळ्यांच्या आत
अगदी सुरक्षित होती
उमलण्याआधीचे ते सुख
ती मनसोक्त अनुभवत होती

मनी तिच्या उठती तरंग
जीवनाचे माहित नव्हते रंग
फांदीवर जणू आईच्या कुशीत
कळी होती फारच खुशीत ।

अन् [illegible] तो दिन उजाडे
कळीचे त्या फूल बनले
सुंदर ते नवे विश्व पाहून
फूल फांदीवर झुलू लागले ।

फांदीवरचा झोपाळा तो
फार काळ टिकला नाही
हिरवळी स्वप्नांचा त्या,
खेळखंडोबा सारा काही ।

कोण्या एका राकट हाताने
फांदीवरचे फूल तोडून नेले
जगणे कळायच्या आत फुलाला,
जीवनाचा अर्थ सांगून गेले !
सत्याची ओळख पटवून गेले !

**अतुल शिंदे**
प्रथम वर्ष कला



Scanned with CamScanner




# स्त्रीभ्रूणहत्या

**राहुल हिंगमिरे, प्रथम वर्ष कला**

■



(**गा**वचे पाटील आपल्या विचारात मग्न असतात. तेवढ्यात त्यांचा मुलगा रविंद्रनाथ आणि त्याची पत्नी पार्वती यांचे आगमन होते. नंतर रविंद्रनाथ आणि पाटील यांच्यात संवाद चालू होतो.)

पाटील : काय रं ए बेन्या, बायकोबरोबर कुठं बोंबलत हिंडतुयास इलेक्शनची तयारी कोण माझा बाप करणार व्हय ?

रविंद्र : काय न्हाय बाबा, ते मी देवळात गेलो होतो.

पार्वती : घ्या मामा प्रसाद घ्या.

पाटील : काय ? देव पोरगा देतो म्हणाला का ?

(या बोलण्याने पार्वती बेचैन होते. तिच्या मनात अनेक प्रश्न उभे राहतात, तेवढ्यात तिचा तोल गेला आणि ती चक्कर येऊन खाली कोसळते. त्यामुळे पाटील आणि रविंद्रनाथ या दोघांच्यामध्ये खळबळ उडते.)

पाटील : आर ए बेन्या, बघत काय बसलाय, आता डॉक्टरलाबी मीच बोलवायचं व्हय.

रविंद्रनाथ : व्हय, व्हय ! डाक्टरला फोन करून बोलावून घी तू.

(डॉक्टर पार्वतीची तपासणी करून बाहेर येतात तोपर्यंत रविंद्रनाथ डॉक्टरांना प्रश्न विचारतो.)

डॉक्टर : काहीही झालेले नाही. पाटील आता गावात पेढे वाटा, तुम्ही आजोबा होणार आहात.

(पाटलांना खूप आनंद होतो. तेव्हापासून ते पार्वतीची जपणूक आपल्या मुलीप्रमाणे करतात. ३ ते ४ महिन्यांचा कालावधी निघून जातो. वेळ पुढे सरकतो तसतसे पाटलांच्या मनात अनेक शंका निर्माण होतात. पाटील रविंद्रला बोलावून घेतात.)

रविंद्रनाथ : काय वं बाबा, तुम्ही मला आणि पार्वतीलाबी एकदम बोलावलं.

पाटील : व्हय ! तुमास्नी डाक्टरकडं जायाचं हाय.

रविंद्रनाथ : पण आमच्यापैकी कोणबी आजारी न्हाय ! मग कशासाठी ?

पाटील : तुमाला डाक्टरकडं सोनोग्राफी करायला जावं लागल. आन या पार्वतीच्या पोटात आपला वारस वाढतुय का ती कार्टी हे तपासून बघा.

रविंद्रनाथ : आव पण बाबा ह्यो तर कायद्यानं गुन्हा हाय न्हवं ?

पाटील : तुमास्नी म्हाईत हाय न्हवं की, या गावात आमचा कायदा चालतू; त्यो कायदा गेला खड्ड्यात. जा आदी सोनोग्राफी करून या.



Scanned with CamScanner

पार्वती : आव पण !

पाटील : पण बिण काय न्हाय. आन् जर कार्टी आसल तर तिला मारून टाका.

पार्वती : न्हाय मामा, म्या आसं काय बी करणार न्हाय.

पाटील : तुला हे करावच लागणार. आम्ही आमच्या बायकोला वचन दिलं होतं की, या घरात पहिल्यां आपला वारसच जन्माला ईल म्हणून आन जर का तू आसं केलं न्हाईस तर तुझी काय खै न्हाय.

(रविंद्रनाथ आणि पार्वती दोघेही बळजबरीमुळे तयार होतात व दवाखान्यात येतात.)

डॉक्टर : नमस्कार, रविंद्रनाथ पाटीलसाहेब, या बसा.

रविंद्रनाथ : डाक्टर, तुम्ही मी सांगल तस करायचं. तुम्ही माझ्या बायकोची सोनोग्राफी करायची.

डॉक्टर : सोनोग्राफी, अहो पाटीलसाहेब तुम्ही काय बोलताय ते तुम्हाला कळतय का ? हा कायद्या गुन्हा आहे. अशा कारणाने माझ्या सर्व मशनरीज जप्त होतील आणि शिवाय मला तुरुंगवास होईल.

रविंद्रनाथ : आसं काय बी होणार न्हाय, याची जबाबदारी माझी.

डॉक्टर : ठीक आहे. या वैनी या.

(सोनोग्राफीचे निदानपत्रक येते.)

डॉक्टर : पाटील, तुमच्या पत्नीच्या गर्भात एक मुलगी वाढत आहे.

रविंद्रनाथ : काय ? डाक्टर तुम्ही आसं करा, ती जन्माला यायच्या आतच तिला मारून टाका.

डॉक्टर : आहो पाटील तुमचं डोकं ठिकाणावर आहे कां ? तुम्ही मला गर्भपात करायला सांगत आहा मला तुरुंगवास होईल, शिवाय एक लाख रुपये दंड.

रविंद्रनाथ : आव डाक्टर त्याचं तुमी काय घेवून बसलाय ? तुमी मागाल तेवढा पैसा मी तुमाला द्याय तयार हाय. मग तर झालं.

डॉक्टर : मग झालं तर. मी मागेल तेवढे पैसे द्यावे लागतील. नाहीतर......

रविंद्रनाथ : व्हय, म्या तयार हाय.

(त्यानंतर गर्भपात करण्याचा दिवस ठरतो. त्या दिवसानंतर बरोबर ७ दिवसांनी गर्भपात करण्याचे ठरते ६व्या दिवसाच्या रात्री रविंद्रनाथ व पार्वती यांच्यात संवाद चालू होतो.)

पार्वती : आव म्या काय म्हणतीया ? हे करणं बरोबर न्हाय. आपण स्वत: आपल्या पोरीला मारायचं तुमालातरी हे पटतंय कां ?

रविंद्रनाथ : आपल्याला दुसरा पर्याय न्हाय. आपल्या घरातच न्हाय तर आपल्या गावात बाबांचा दबदबा हाय. त्यांच्यापुढं बोलणं ठीक न्हाय. ते म्हणत्याल तसच करावं लागणार.

पार्वती : याला दुसरा पर्याय न्हाय का ?

रविंद्रनाथ : न्हाय.

(त्या गोष्टीचा परिणाम पार्वतीच्या डोक्यावर होतो आणि त्या रात्री एक अघटीत कृत्य घडते.)

पार्वतीच्या गर्भात वाढत असणारी मुलगी (पडद्यामागील पात्र) : आई ! आई, अग इकडे-तिकडे का



Scanned with CamScanner

पाहतेस ? मी आहे, तुझी मुलगी जिला तू उद्या गर्भपात करून मारणार आहेस. भिऊ नकोस, मी भूत वगैरे नाही. माझी आईच गर्भपात करणार हे कळल्यानंतर मला धक्काच बसला. माझा तर विश्वासच बसत नाही. एखाद्याच्या पायाला ठेच लागली तर, आई ग ! असं म्हणून आईची आठवण काढतात. पण मी कोणाची आठवण काढू ? आई, पण असं का ? यात माझा काय दोष ? फक्त एवढच ना की मी मुलगी आहे. यापुढे तुम्हाला मुलगाच होईल हे कशावरून आणि तो मुलगा तुमचं भविष्य उज्ज्वल करेल हे कशावरून ?

आई, कल्पना चावलाने आपल्या देशासाठी आपले प्राणत्याग केले. याचबरोबर इंदिरा गांधी यांनी आपले आयुष्य आपल्या देशाच्या सेवेसाठी घालवले. मदर तेरेसांनी तर आपले आयुष्य गोर-गरिबांच्या सेवेसाठी घालवले. मी मदर तेरेसा का होऊ शकणार नाही ? मदर तेरेसा झाली नाही तर मदर तेरेसासारखे व्यक्तिमत्त्व तरी घडवेन. आई मला उद्याची कल्पना चावला व्हायचय, मला उद्याची इंदिरा गांधी, किरण बेदी व्हायचं आहे. मला पुढचं आयुष्य जगायचं आहे. यापुढे तुला मुलगीच झाली तर तू तिलाही मारून टाकशील ? मग उद्याची पिढी विश्वास कोणावर ठेवेल ?

आई, मला मारू नकोस, मी उद्याची कल्पना चावला, किरण बेदी, इंदिरा गांधी झाली नाही तर काय झालं ? मी एक चांगली स्त्री होईन. एक चांगली पत्नी होईन. पण आई तू मला मारू नकोस. आई तू बाबांची समजूत काढ आणि मला वाचव. आई मला वाचव !...

■ ■



## माझं घर

आचार विचार ही घराची आखणी आहे
प्रेम ही घराची छाया आहे
थोर माणसं ही घराचा पाया आहे
माणुसकी ही घराची तिजोरी आहे
गोड शब्द ही घरातील धन-दौलत आहे
शांतता ही घरातील लक्ष्मी आहे
आत्मविश्वास हे घरातील दैवस्थान आहे.
आई-वडील हे घरातील दैवत आहे
पैसा घराचा पाहुणा आहे
समाधान हे घरचं सुख आहे
गर्विष्टपणा हा घराचा वैरी आहे

**सुजाता देवकर**
**तृतीय वर्ष कला**

## शिक्षण म्हणजे.... !

शिक्षण म्हणजे मानवतेचा संस्कार
शिक्षण म्हणजे सुसंस्कृतपणाचा आविष्कार
शिक्षण म्हणजे नव्हे फक्त ज्ञान आणि तंत्रज्ञान
शिक्षण म्हणजे सदाचार आणि माणुसपण
शिक्षण म्हणजे जाणिव सामाजिक बांधिलकीची
शिक्षण म्हणजे नवीदृष्टी मानवतेची
शिक्षण म्हणजे करूणा प्राणिमात्रांबद्दलची
शिक्षण म्हणजे पाऊलवाट आदर्शांची
शिक्षण म्हणजे समतेचा विचार
शिक्षण म्हणजे दूर तो अहंकार
शिक्षण म्हणजे मनाचे पावित्र्य
शिक्षण म्हणजे शुध्द चारित्र्य
शिक्षण म्हणजे रक्षण करणं शिलाचे
शिक्षण म्हणजे पालन करणे नीतीमूल्यांचे
शिक्षण म्हणजे प्रेम करणं सृष्टीवर
शिक्षण म्हणजे कुर्बान होणं राष्ट्रावर

**विकास राजाराम बनसोडे**
**तृतीय वर्ष कला**



Scanned with CamScanner

# शास्त्रज्ञ डॉ.होमी जहाँगीर भाभा

कु.स्वाती सोपान सावंत, तृतीय वर्ष वाणिज्य






डॉ.होमी जहाँगीर भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ मध्ये मुंबईतील एका श्रीमंत पारशी कुटुंबात झाला. एल्फिन्स्टन कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केल्यावर मुंबईतील रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून त्यांनी उच्च शिक्षण घेतले. त्यानंतर आपले काका दोराबजी टाटा यांच्या सल्ल्यावरून त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. दोराबजी यांनी त्यांना जमदेशपूर येथील आपल्या टाटा मिल्स प्रकल्पात मेटॉलर्जिस्ट पदावर नोकरी देऊ केली होती. भाभा यांनी १९३४ मध्ये डॉक्टरेट मिळविली. त्यांनी नेल्स बोहर यांच्या समवेत क्वांटम थिअरीचा अभ्यास केला. वॉल्टर हेटलर यांच्यासह त्यांनी कॉस्मिक रेडिएशनमध्ये महत्त्वाच्या असणाऱ्या इलेक्ट्रॉन सोर्सचे कॅस्केड थिअरीवर काम केले.

दुसरे महायुध्द सुरू झाल्यामुळे १९३९ मध्ये त्यांना भारतात परतावे लागले. भारतात आल्यावर त्यांनी सी.व्ही. रमण यांच्या समवेत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये कॉस्मिक रिसर्च विभागाची स्थापना केली. त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च विभागाची स्थापना केली. १९४५ मध्ये ते या संस्थेचे संचालक बनले. २० मार्च १९४१ मध्ये त्यांची रॉयल सोसायटीच्या फेलोपदी निवड झाली. डॉ. भाभा केवळ महान वैज्ञानिकच नव्हते तर एक कुशल प्रशासकही होते. ते चांगले चित्रकार आणि शास्त्रीय संगीताचेही जाणकार होते.

स्वातंत्र्यानंतर पं. जवाहरलाल नेहरूंच्या साहाय्याने त्यांनी अणुऊर्जेचा वापर शांततेसाठी करण्याच्या प्रक्रियेचा पाया घातला. १९४८ मध्ये त्यांनी ॲटोमिक एनर्जी कमिशन ऑफ इंडियाची स्थापना केली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९५६ मध्ये मुंबईजवळील ट्रॉम्बे येथे आशियातील पहिली अणुभट्टी उभारण्यात आली. ॲटॉमिक रिसर्च सेंटरची स्थापना त्यांनीच केली. त्यांच्याच नावावरून जी नंतर भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर म्हणून ओळखली जाऊ लागली.

डॉ. भाभा भारतीय अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष बनले. १९५४ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सरकारने सन्मानित केले. ते भारतात केंद्रिय मंत्रिमंडळाच्या सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटीचे सदस्यही होते. इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च या संस्थेवर डॉ. विक्रम साराभाई यांना नियुक्त करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. जिनिव्हात १९५५ मध्ये झालेल्या अणुऊर्जेचा शांततापूर्ण वापर या विषयावरील संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. १९६६ मध्ये स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या एका विमान दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला.

■ ■ ■



Scanned with CamScanner




# ग्रामीण भागातील स्त्रियांचा चिकित्सक अभ्यास

कु.वैशाली मानसिंग काटकर, कु.नम्रता संभाजीराव पोळ, तृतीय वर्ष वाणिज्य



**१. प्रास्ताविक :**

२१व्या शतकात वावरताना स्त्रियांनी स्वयंसिध्द बनावे, उद्योजक बनावे. सर्व क्षेत्र स्त्रियांना आता खुली आहेत. सर्व सत्ता स्त्रिया आता काबीज करतील अशी विधाने अनेकदा आपणांस ऐकायला, वाचायला मिळतात. ''चूल व मूल'' हे क्षेत्र मागे पडले आहेत. असे चित्र एकीकडे असतांना आज स्त्रियांचे कुटुंबातील व समाजातील स्थान पाहताना त्यांच्या कुटुंबातील वागणूक व दर्जा तपासणे गरजेचे आहे.

**२. अभ्यासाचे उद्देश :**

१) स्त्रियांचा सामाजिक, राजकिय, आर्थिक, वैचारिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक दर्जाचा अभ्यास करणे.

२) स्त्रियांच्या विविध समस्या अभ्यासणे.

३) समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**३. निवड पध्दती :**

अभ्यासासाठी माण तालुक्यातील १०४ गावांपैकी १० गावातील ५० स्त्रियांचा Random Sampling Methodचा वापर केला व निवड केली.

धर्म




**४. माहिती मिळवण्याची पध्दती :**

अ) **प्राथमिक माहिती :** प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. याशिवाय मुलाखती व प्रत्यक्ष भेटीद्वारे प्राथमिक माहिती मिळवली.

ब) **दुय्यम माहिती :** दुय्यम माहिती मिळवण्यासाठी महाविद्यालयात ग्रंथालयातील मासिके, वेबसाईटचा वापर केला.

**५. अभ्यासाचे महत्त्व :**

१) स्त्रियांचे सामाजिक, राजकिय, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक दर्जा जाणून घेणे यासाठी ग्रामीण भागातील स्त्रियांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

२) या अभ्यासाने स्त्रियांच्या विविध समस्यांवर उपाययोजना सुचवता येतील.



Scanned with CamScanner

### ६. अभ्यासाची मर्यादा :

हा अभ्यास केवळ माण तालुक्यातील १० गावांतील ५० स्त्रियांपुरताच मर्यादित आहे.

### ७. स्त्रियांची सद्यस्थिती :

**७.१) कौटुंबिक दर्जा :** १) जमिनीची मालकी - १०%; २) वस्तूंची खरेदी - ६५%

**७.२) आरोग्याचा दर्जा :** १) जास्त वजन - २४%; २) कमी वजन - ४०%; ३) सशक्त - ३६%

**७.३) शैक्षणिक दर्जा :**

१) **शिक्षण :** अ) ०-७ = २०%; ब) ८-१० = ३२%; क) ११-१५ = ३६%; ड) १५च्या पुढे = १२%

२) **शैक्षणिक स्वातंत्र्य :** अ) शिक्षणासाठी पाठिंबा - ४८%; ब) शिक्षणाबाबत निर्णय - २६%

३) **आर्थिक स्वातंत्र्य :** अ) दारिद्र्यरेषेखालील - ३०%; ब) विमा संरक्षण - ५०%; क) बँक खाते - ६८%; ड) आर्थिक परिस्थिती सक्षम - ९४%; इ) बचत गट सहभाग - ३६%; फ) प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग - ३२%

**७.४) सामाजिक दर्जा :** १) एकत्र कुटुंबपध्दती - ५८%; २) गर्भजीव चाचणी सहमती - ६%; ३) समाजाच्यासाठी विशेष योगदान - २८%; ४) भ्रष्टाचारास आळा - ३६%; ५) दैवीशक्ती - २०%

**७.५) वैचारिक स्वातंत्र्य :** १) आवडी-निवडीचे स्वातंत्र्य - ३८%; २) निर्णय स्वातंत्र्य - २८%; ३) लग्नासंबंधी स्वातंत्र्य - ३०%

**७.६) संरक्षण व कायद्याची माहिती :** १) स्त्री कायद्याबाबत माहिती - ५८%; २) महिला संरक्षण गरज - १००%; ३) स्त्रीशिक्षण गरज - १००%

**७.७) व्यवसाय :**




**७.८) राजकारणातील सहभाग :** १) महिला सहभाग - १८%; २) पुरुष सहभाग - ८२%

**७.९) निर्णय स्वातंत्र्य :**




**७.१०) ग्रामीण भागातील मुला-मुलींचे प्रमाण :**




### ८. निष्कर्ष :

• संपत्तीची अल्पप्रमाणात मालकी • आरोग्याचा दर्जा खालावलेला • उच्च शिक्षणाचे कमी प्रमाण • शैक्षणिक स्वातंत्र्याचा अभाव • दारिद्र्य रेषेत ३० टक्के प्रमाण • विमा संरक्षणाची गरज • बँक खात्याच्या प्रमाणात वाढ • दैनंदिन गरजांची पूर्तता • बचत गटात सहभाग वाढवावा • एकत्र कुटुंब पध्दतीला महत्त्व • गर्भलिंग चाचणीस विरोध • अल्पप्रमाणात अंधश्रद्धाळू • वैचारिक स्वातंत्र्याचा अभाव • स्त्री कायद्याची बऱ्यापैकी माहिती •



Scanned with CamScanner

उद्योजकतेचा अभाव • राजकारणातील सहभागाचा अभाव; निर्णय स्वातंत्र्य बऱ्यापैकी आहे • मुलींच्या प्रमाणात वाढ.

९. उपाययोजना/शिफारशी :

सामाजिक दृष्टीकोनात बदल; स्त्री-पुरुष समानता तत्वाचा अवलंब; स्त्री कायद्यांची अंमल-बजावणी; सामाजिक बंधनातून मुक्तता; शिक्षणाविषयी जागृकता; निर्णयात सहभाग; वैयक्तिक निर्णय स्वातंत्र्य; संरक्षणासाठी प्रशिक्षण; राजकारणातील निर्णय स्वातंत्र्य; जनजागृती; बचत गटातून विकास; शासकिय योजनांची माहिती; स्वत:पासून विकासाची सुरूवात; महिलांसाठी मेळावे व प्रशिक्षण कार्यक्रम; शिक्षणासाठी पूर्ण स्वातंत्र्य; स्त्रियांना सामाजिक कार्यात प्रेरणा देणे; आरोग्य विषयक सुविधात वाढ; संकुचित दृष्टिकोनातून मुक्तता; उद्योजकतेस वाव.

संदर्भ : पुढारी वर्तमान पत्र; सांगते ऐका-हंसा वाडकर; उद्योजक; पंचायत समिती माण; माणदेश फाऊंडेशन; विविध महिला बचत गट; वेबसाईट.

■ ■ ■

## बेकारी

घेतली पदवी B.A., B.Com., B.Sc., B.C.A.,
पण नाही मिळाली नोकरी
वाढत गेली फक्त बेकारी
रोजगारावाचून राहू लागला तो घरी
नाही करू शकत एखाद्याकडे चाकरी
म्हणतो मी कशासाठी घेतली पदवी
यामुळेच बरबाद झाली जिंदगी
वाढत गेली बेकारी
जातो मुलाखतीला मोठ्या आशेने
येतो रिकाम्या हातांनी परत घरी
कोण देणार याला नोकरी
नाही नोकरी तर मिळेल का छोकरी
वळतो बेकार वाईट प्रवृत्ती गुन्हेगारी
आपल्या शिक्षणाचा उपयोग गुन्ह्यामध्ये करी
जातो बिन भाड्याच्या घरी
इथेच पडते त्याच्या जीवनाला मोठी दरी
नाही पुन्हा परतत तो आपल्या घरी
जरी असली त्याची आई खूप आजारी
गेली सोडून बिचारी या जगाला
तरी नाही जाणिव तिचा पुत्र 'जगुला'
टाकले संपवून त्यांने आपल्याच बॉसला
पडला बळी या बेकारीला.



**अमृत परशुराम बोराटे**
तृतीय वर्ष कला

## जीवन हे असच जगायचं असतं

दु:खाला कधी घाबरायचं नसतं,
आनंदाने सर्वांना फुलवायचं असतं,
[illegible] [illegible] व्हायचं असतं,
[illegible] जगायचं असतं ।।धृ।।

आई वडिलांवर रागवायचं नसतं,
कर्तृत्वाने शिखर गाठायचं असतं,
अपयशाला कधी घाबरायचं नसतं ।।१।।

श्रीमंतीने कधी फुगायचं नसतं,
गरीबीला कधी विसरायचं नसतं,
नशिबाला दोष देऊन थांबायच नसतं ।।२।।

अंधाराला घाबरायचं नसतं,
प्रकाशाने तेजस्वी व्हायचं असतं,
चांदण्यासारखं चमकायचं असतं ।।३।।

आई वडिलांच्या सेवेत राहायचं असतं,
वाईट मैत्रित आयुष्य घालवायचं नसतं,
ज्यांनी जन्म दिला त्यांना विसरायचं नसतं ।।४।।

कथा, कीर्तन सतत ऐकायचं नसतं,
परंतु संत वचनांना कधी विसरायचं नसतं,
धर्मासाठी सतत लढायचं असतं
जीवन हे असच जगायचं असतं ।।५।।

**रेश्मा कृष्णराज सावंत**
द्वितीय वर्ष कला



Scanned with CamScanner

# लोकपाल

कु.कोमल लक्ष्मण देवकर, तृतीय वर्ष कला



**जन लोकपाल विधेयक :**

भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी भारतामध्ये नेमावयाचे लोकपाल अधिकारी, त्यांची नेमणूक, त्यांचे कार्यक्षेत्र आणि त्यांची कर्तव्ये यांची निश्चिती करण्यासाठी अण्णा हजारे आणि त्यांचा गट यांनी सुचवलेल्या विधेयकाचा मसुदा आहे.

**विधेयक :**

भारतीय केंद्रशासनाने मांडलेल्या लोकपाल विधेयकात लोकसभेने काही दुरूस्त्या केल्या. राज्यसभेत मात्र १८७ दुरूस्त्या सुचविण्यात आल्या आहेत. आणि त्यावर अजून कोणताही निर्णय व्हायचा आहे.

**परिशिष्ट २ कलम ३ उपकलम :**

लोकपालाचे अध्यक्ष हे भारताचे सरन्यायाधीश असावे वा माजी सरन्यायाधीश असावे. ती व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाची विद्यमान वा माजी न्यायमूर्ती सुध्दा असू शक किंवा उपकलम ३ (ब) मधील अटींची पूर्तता करू शकणारी वा तशी पात्रता असणारी व्यक्ती असू शकत (ब) उर्वरित आठ सदस्यांपैकी चार सदस्य हे न्यायालयीन सदस्य असतील. आठ सदस्यांपैकी अर्धे अर्था चार सदस्य हे अनुसुचित जाती, जमाती, अन्य मागासवर्गीय, अल्पसंख्यांक आणि महिला या वर्गवारीती असावे, उपकलम ३(अ) न्यायालयीन सदस्य म्हणून नियुक्त करण्यासाठी अशी एखादी व्यक्ती जिची अफा क्षमता असेल आणि भ्रष्टाचारविरोधी धोरण संदर्भात, प्रशासनात, दक्षता विभागात, विमा, बँका, कायद आणि प्रबंधन या आर्थिक क्षेत्रात जिने कमीत कमी २५ वर्षे काम केलेले असेल ती व्यक्ती पात्र ठरेल.

**लोकपालपदी नियुक्त होणारी व्यक्ती खालील वर्गवारीत नसावी -**

अ) खासदार, आमदार; ब) कोणत्याही आरोपात दोषी ठरविण्यात आलेली व्यक्ती; क) वयाने कमी कमी ४० वर्षापेक्षा कमी; ड) पंचायत वा महापालिका सदस्य; इ) केंद्रे वा राज्य सरकारच्या सेवेतून बडत वा हटविण्यात आलेली व्यक्ती. अशी व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्न नसेल, लाभाच्या कोणत्या पदावर कार्यरत नसेल, तिचा कोणताही व्यवसाय नसेल, कोणत्याही क्षेत्रात काम करीत नसेल, नियुक्ती नंतर त्याला कोणत्याही लाभाच्या पदावर राहता येणार नाही, कोणत्याही क्षेत्रात नोकरी करता येणार नाही कोणत्याही व्यवसायात कोणत्याही व्यवस्थापनाशी संबंध ठेवता येणार नाही.

**लोकपालाचे वेतन :**

लोकपालाचे वेतन हे सरन्यायाधिशांइतके तर इतर सदस्यांचे वेतन हे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमू



Scanned with CamScanner

इतके असेल. जेव्हा केव्हा लोकपाल रजेवर असतील, तेव्हा राष्ट्रपतींनी नामनियुक्त केलेली व्यक्ती ही लोकपालाच्या अधिकारांचे पालन करेल.

**लोकपालाच्या चौकशीची पध्दत :**

लोकपालच्या अंतर्गत एक चौकशी शाखा असेल. डायरेक्टर ऑफ इन्क्वायरी हे त्यांचे प्रमुख असतील. लोकपाल नियुक्त झाल्यानंतर त्यांनी अधिसूचना काढून प्रॉसिक्युशन विंगचे गठण करावे. लोकपालाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी होणारा खर्च, वेतन अधिक आर्थिक तरतूदी या एकीकृत निधीतून केला जाईल.

**लोकपाल चौकशीची कार्यकक्षा :**

लोकपालातील दोनतृतीअंश सदस्यांची संमती या चौकशीसाठी असली पाहिजे. ही चौकशी इन कॅमेरा होईल. जर ती तक्रार खोटी आढळून आली तर या चौकशीचे दस्तऐवज प्रकाशित करता येणार नाही वा कुणालाही उपलब्ध करून देता येणार नाहीत. मंत्रीमंडळातील कोणतीही व्यक्ती, लोकसभा-राज्यसभेतील सदस्य, अ, ब वर्गातील जनसेवक या व्याख्येत बसणारे अधिकारी. एखाद्या खासदाराने सभागृहात केलेले निवेदन, या प्रस्तावावर केलेले मतदान हे चौकशीच्या कार्यकक्षेत येणार नाही. लाच देणे/घेणे यासंबंधीचे आरोप असतील तर मात्र चौकशी करता येईल. मात्र राज्य सरकारच्या संमती शिवाय त्यांना कोणतीही कारवाई करता येणार नाही.

**लोकपालमधील सुनावणीची पध्दत :**

लोकपालची सुनावणी जेव्हा होईल, तेव्हा अध्यक्ष आणि दोन अधिक सदस्यांचे एक खंडपीठ असेल. प्रत्येक खंडपीठात एक न्यायालयीन सदस्य असेल. लोकपाल असलेले खंडपीठ लोकपालांच्याच अध्यक्षतेत असेल. जेथे लोकपाल नाहीत तेथे न्यायालयीन सदस्य प्रमुख असतील. हे खंडपीठ दिल्लीत वा लोकपालांना योग्य वाटेल अशा ठिकाणी असेल. समसंख्येचे खंडपीठ असेल आणि मत विभाजन झाले तर ते प्रकरण लोकपालांकडे अग्रेषित करावे लागेल. लोकपालाकडे येणाऱ्या तक्रारी, चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणे यांची माहिती वेळोवेळी संकेत स्थळावर प्रकाशित करणे बंधनकारक असेल.

**लोकपालाचे अधिकार :**

२५ दिल्ली पोलीस एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट १९४६ आणि सीव्हीसीच्या कलम ८ नुसार लोकपालाला अधीक्षक, निर्देश आणि तपासाचे पूर्ण अधिकार असतील. मात्र अन्य कुठल्या संस्थेकडून तपास करण्यास सांगण्याचे त्यांना अधिकार असणार नाही.

लोकपालापुढे सुरू असलेल्या कोणत्याही सुनावणीला भादंविच्या १९३ कलमानुसार न्यायालयीन सुनावणी मानण्यात येईल. त्यांना कुणालाही हजर राहण्यासाठी समन्स बजावता येईल/कोणत्याही प्रकारचे कागदपत्र मागविता येतील/कोणत्याही कार्यालयातून कागदपत्र मागविता येतील. कोणतीही संपत्ती जप्त केल्यानंतर त्याचा [illegible] एक महिन्याच्या आत विशेष न्यायालयात [illegible] लागेल. आणि तेथे त्यावर शिक्कामोर्तब करावे लागेल.

**विशेष न्यायालये :**

लोकपालांनी सुचविल्याप्रमाणे केंद्र सरकार विशेष न्यायालयांची निर्मिती करेल. या न्यायालयात प्रकरण दाखल केल्यानंतर एक वर्षाच्या आत त्याची सुनावणी पूर्ण करावी लागेल. काही कारणाने सुनावणी पूर्ण झाली नाही तर तीन महिन्यांची मुदतवाढ त्यांना देता येईल. असे तीन वेळा होऊ शकते. मात्र प्रत्येक वेळी त्याची लेखी कारणे द्यावी लागतील. कोणत्याही स्थितीत दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी देता येणार नाही.

**लोकपाल सदस्यांविरूध्दच्या तक्रारी :**

लोकपाल सदस्यांविरूध्द तक्रार झाल्यास त्याची चौकशी लोकपालाला करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने तशी शिफारस केल्यानंतर राष्ट्रपती लोकपाल वा सदस्याला त्या पदावरून दूर करतील.



Scanned with CamScanner

### लोकपाल व लोकायुक्त पदाची पार्श्वभूमी व आवश्यकता, गोषवारा :

'ओंबुडसमन' या इंग्रजी शब्दाला पर्यायी वा प्रतिशब्द म्हणून भारतात लोकपाल ही संज्ञा ह्या शतकाच्या उत्तरार्धात आली. लोकांच्या प्रशासकीय कारभाराबाबतच्या संदर्भात तक्रारींची नोंद घेऊन त्यांची चौकशी करणारा आणि लोकांच्या हक्कांचे पालन करणारा एक स्वतंत्र-स्वायत्त अधिकारी म्हणजे लोकपाल होय.

या देशात लोकपालाची नियुक्ती केलेली आहे. केंद्रस्तरावर लोकपाल व राज्यस्तरावर लोकायुक्त ही संकल्पना अवलंबली जाते.

भारतात जनतेमधून लोकपाल या पदाच्या मागणीसाठी कायदा करावा. यासाठी जोरदार मागणी केली जात असून देश भ्रष्टाचाराने पोखरून निघाला आहे. परंतु सत्तेवरील सरकार त्यास अनुकूल प्रतिसाद देत नाही. या सत्तेच्या विरोधात आण्णा हजारे यांनी मोठ्या प्रमाणात जन आंदोलने केले. या आंदोलनाला जनतेतून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. मात्र सरकारने त्यास न जुमानता हे विधेयक तटस्थ ठेवले. लोकपाल या संस्थेत काही उणिवा असल्यास तिची कार्यपध्दती काही बाबतीत सदोष असली तरी त्यामुळे तिची गरज कमी होत नाही. अखेर लोकपालाची सेवा किती परिणामकारकरीत्या प्रत्यक्ष कृतीत उतरते आणि नागरिकांचा मित्र म्हणून कार्य करते यावरच या संस्थेचे यश अवलंबून आहे. भारतातील लोकपाल व लोकायुक्त विधेयक, जनलोकपाल व लोकपाल विधेयक यातील फरक व लोकपाल पदाची आवश्यकता या विषयावर लिखाण केले आहे. ही या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

### भारतातील लोकपालपदाचा इतिहास :

है। क्योंकि, सहनशक्ती पत्थर को पिघला देती है। हमें अपने आप में इतनी शक्ती लानी है कि कोई अपनी ग्लानी करे, तो उसके बदले हमें उनको बददुआ देने चाहिए। मान, अपमान, निंदा, स्तुती इन सब में हमें खुश रहना चाहिए। सहनशक्ती इतनी होनी चाहिए कि कोई भी कितने कड़ुवे बोल बोले, तो हमें अपनी सहनशक्ती से उसे बदलना है। जैसे कि आम का पेड़ पत्थर मारने से वह मीठा आम देता है। ''इसिलिए हमें किसीसे बदला नहीं लेना उसे बदल के दिखाना है।''

**४) समाने की शक्ती :**

हमें सबके अवगुण समाकर लेने चाहिए। बड़े दिलवाला बनना चाहिए। गलती करे तो माफ करना चाहिए। इस शक्ती को नदी की मिसाल देते है। नदी में हम, कुछ भी कुड़ा करकट गंधे कपड़े लेकर सब ड़ालते है। वो कभी कहती है क्या मेरे [illegible] में मत ड़ालो। वह सब समाकर बह जाती [illegible] तरह हमें सारी कमियाँ, कमजोरीयाँ, [illegible] सब पेट में लेकर बुजुर्ग की तरह चलना चाहिए। यह शक्ती अपने जीवन में अपनानी है, तो हमें सच्चे सुख का एहसास होगा।

**५) सामना करने की शक्ती :**

वैसे तो हम अपने जीवन में हर एक मुसीबत का सामना करते जीते है। लेकिन हमें मृत्यु से सामना करने का ज्ञान ईश्वर ने दिया है। कोई अपना मरता है तो रोते पिटते है। हमें वैराग्य आता है। लोग कहते है, इन्सान के जीवन में कुछ नहीं। कब क्या होगा यह हमें पता है क्या ? यह शरीर तो मिट्टी का है। मिट्टी में मिल जाता है। आत्मा एक शरीर छोड़ दुसरा धारण करती है। आत्मा, अजर, अमर, अविनाशी है। इसका कभी विनाश नहीं होगा। सिर्फ वह शरीररूपी कपड़ा बदलती है। इसको हमारे जीवन में धारण करना है। तो हम अपने जीवन में निड़र बनके जी सकते है।

**६) सहयोग शक्ती :**

हमें सबके अवगुण समाकर लेने चाहिए यह तो है। पर इससे बढ़कर जीवन सहयोग का बहुत महत्त्व है। जैसे सबके सहयोग से एक इमारत बनती है। वैसे हमें अपने जीवन में हर मुसीबत, हर वक्त हर एक को मुसीबत का हाथ देना चाहिए। सहयोग से बड़े से बड़ा काम आसान होता है। सहयोग की ताकद से हम बहुत जल्दी आगे जा सकते है। सहयोग एक शस्त्र है। जो बड़ा काम निपटाता है।

**७) परखने की शक्ती :**

जैसे जौहरी हिरे की बड़ी आसानी से परख करता है। वैसे ईश्वर ने हमें भी जीवन में ईश्वर ने परखने की शक्ती दी है। इसी शक्ती से किसी व्यक्ती को हम अपनी चाल-चलन से परख सकते है। हमें यह युग पहले से मिला है। लेकिन इसका इस्तमाल नहीं करते। और हम धोखा खाते है।

**८) निर्णय करने कि शक्ती :**

निर्णय करने की मिसाल तराजु है। हम कुछ तुलने या नापने के लिए तराजु का इस्तमाल करते है। कोर्ट में न्यायाधिश के सामने निर्णय के लिए इस साधन को अपनाया गया है। वैसे बुद्धी से जज किया जाता है। हमें सोच समझकर निर्णय लेना चाहिए। मन ही मनमें ईश्वर की सलाह लेनी चाहिए। तो हमारा काम अच्छा होगा। इसकी मिसाल है हमारे श्री छत्रपती शिवाजी महाराजजी।

■ ■ ■



Scanned with CamScanner



## WITH RESPECT TO $8^{TH}$ MARCH

# WORLD WOMEN'S DAY

1) First Post Graduate (M.A.) = Chandramukhi
2) First Indian Woman Doctor = Dr.Kadambari Ganguly
3) First Indian Woman Lawyer = Karneliya Sorabji
4) First Indian Woman Minister = Vijayalaxmi Pandit
5) First Indian Woman Pilot = Prem Mathur
6) First Indian Woman High Court Judge = Anna Chandi
7) First Indian Woman Prime Minister = Indira Gandhi
8) First Indian Woman Suprime Court Judge = Fatima Bedi
9) First Indian Woman on Everest = Bachendri Pal
10) First Indian Woman Cheif = Sucheta Kriplani
11) First Indian Woman I.P.S. = Kiran Bedi
12) First Indian Woman Governor = Sarojini Naidu

**Sayali Sanjay Yadav**
XI Sci



Scanned with CamScanner

# वार्षिक अहवाल २०१३-२०१४

येणारा प्रत्येक दिवस आपल्यासाठी एक संधीची खिडकी उघडी करीत असतो. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचे कार्यालयीन सेवक, प्राध्यापक, समिती सदस्य, समितीचे चेअरमन समन्वयक आणि प्राचार्य सतत कृतीशील असतात. याची पावती म्हणजे २०१३/१४चा अहवाल विभाग !

■

**विभागीय संपादक**

**प्रा.सुभाष रणधीर, विभागप्रमुख, इंग्रजी**

## कमवा व शिका योजना

मानवी श्रमाचे मूल्य रूजविण्यासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या पाठबळ नसलेल्या [illegible] शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्याच्या हेतूने पद्मभूषण डॉ.भाऊराव पाटील तथा अण्णांनी 'कमवा व शिका' योजनेचं रोपटं रूजवून स्वावलंबी शिक्षणाचा मंत्र दिला. या महाविद्यालयात सदर योजना राबविण्यात येते.

शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच या योजनेत प्रवेश देण्यात येतो. सदर विद्यार्थी महाविद्यालय परिसर वनस्पतीशास्त्र बाग, प्राचार्य निवास व परिसरातील देखभाल करतात. तसेच ते ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यालयीन प्रशासकीय कामात व संगणक विभाग इ. मध्ये मदत करतात.

या योजनेअंतर्गत सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात एकूण ३० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांच्यासाठी रूपये ३०,०००ची महाविद्यालयाने तरतूद केली आहे. सदर योजनेस मा.प्राचार्य डॉ.सि.जे.खिलारे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

**प्रा.आर.जी.कदम**
**चेअरमन**

## ग्रंथालय

ग्रंथालय हे महाविद्यालयाचा आत्मा आहे. लिखित साहित्य आणि त्याचे वाचन या विरहित मनुष्य जीवन ही कल्पना करता येत नाही. ज्ञानार्जनात सहकार्य करणे हे ग्रंथालयाचे आद्य कर्तव्य आहे. याची जाण ठेवून महाविद्यालयाचे ग्रंथालय कार्यरत आहे.

**ग्रंथसंपदा :**

आमच्या महाविद्यालयातील ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंख्या ७१,३२२ इतकी आहे. चालू आर्थिक वर्षात एकूण रूपये २,३५,४६१ किंमतीची २,८६१ ग्रंथाची भर पडली आहे. अजूनही ग्रंथाची खरेदी चालू आहे. ग्रंथालयात एकूण ४५ नियतकालिके व १० वर्तमानपत्राची आवक होत असल्याने प्राध्यापक व विद्यार्थी यांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी उपयोग होतो. बुक बँक योजनेचा लाभ गरीब व होतकरू ४११ विद्यार्थ्यांनी घेतला. या शैक्षणिक वर्षाचे विशेष म्हणजे दि.१७/०२/२०१४ रोजी एकदिवशीय ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले आणि त्याचा सर्व सेवक वर्ग आणि विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

ग्रंथालयाचा जास्तीत-जास्त इतर ग्रंथालयांना व वाचकांना त्वरीत उपयोग करून देण्यासाठी सध्या ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्याचे काम चालू आहे.



Scanned with CamScanner

मा.प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. यांचे वेळोवेळी सहकार्य व मौलिक मार्गदर्शन मिळाले.

**ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रम :**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या प्रौढ व निरंतर व निरंतर शिक्षण विस्तार कोर्स यांच्या अंतर्गत ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र हा तीन महिने मुदतीचा अभ्यासक्रम या महाविद्यालयात चालविला जातो.

एप्रिल २०१३ ते जून २०१३ या कालावधीत या केंद्रातील बॅचचा निकाल १०० टक्के लागला. सदर अभ्यासक्रमास स्थानिक महाविद्यालयाचे ग्रंथपाल यांनी काम पाहिले.

**प्रा.श्री.व्ही.एस.वाघेरे** ग्रंथपाल

**प्रा.डॉ.आर.आर.मुल्ला** चेअरमन

## विद्यार्थी मंडळ

विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने दि.६ सप्टेंबर, २०१३ रोजी विद्यार्थी मंडळाची निवडणूक पार पाडण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या स्टॅट्यूटप्रमाणे सर्व नियमांचे आणि मार्गदर्शन तत्त्वांचे पालन करून ही निवडणूक प्रक्रिया व्यवस्थितरित्या पूर्ण करण्यात आली. एकूण १९ विद्यार्थी प्रतिनिधी असलेल्या विद्यार्थी मंडळामधून लोकशाही मतदान प्रक्रियेत श्री.संदेश जनार्दन जगदाळे या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, विद्यार्थी कल्याण मंडळ, समिती सदस्य सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

चालू शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी मंडळाच्या चार बैठकांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या तसेच महाविद्यालयाच्या विविध अडचणीवर तसेच उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. काही धोरणात्मक निर्णयही घेण्यात आले. १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी विद्यार्थी मंडळाच्या सहकार्याने वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ सुनियोजित पद्धतीने संपन्न झाला. महाविद्यालयातील विविध उपक्रम पार पाडण्यामध्ये विद्यार्थी कल्याण मंडळाचे आणि सर्व सदस्यांचे सक्रीय सहकार्य लाभले.

**प्रा.आर.डी.जाधव**
**चेअरमन,विद्यार्थी कल्याण मंडळ**

## यु.जी.सी. समिती

महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आर्थिक स्थिती भक्कम असावी लागते. त्यासाठी यु.जी.सी. कडून मिळणारी विविध अनुदाने ही सिंहाचा वाटा उचलतात. त्यासाठी सदर समिती दरवर्षी विविध प्रस्ताव यु.जी.सी. कडे पाठविते.

या वर्षात यु.जी.सी. कडून महाविद्यालयास एकूण रू. एकोणवीस लाख, शहात्तर हजार, दोनशे पन्नास इतके अनुदान प्राप्त झाले आहे. त्यामध्ये बाराव्या प्लॅन अंतर्गत रू. सात लाख, छप्पन्न हजार, दोनशे पन्नास फ्लड लाईटिंग ऑफ बास्केटबॉल कोर्टसाठी रू. आठ लाख इतिहास, रसायनशास्त्र व प्राणीशास्त्र या विषयांच्या नॅशनल कॉन्फरन्स घेण्यासाठी रू. [illegible] लाख, साठ हजार आणि मायनर रिसर्च प्रोजेक्टसाठी रू. एक लाख, साठ हजार अशी अनुदाने प्राप्त झाली आहेत.

गतवर्षी इनडोअर स्पोर्टस कॉम्प्लेक्ससाठी रू. ७० लाख अनुदान मंजूर झाले होते. तसेच फ्लड लाइटिंग ऑफ बास्केटबॉल कोर्ससाठी रू. १० लाख मंजूर झाले होते. सदर दोनही कामे पूर्ण झालेली आहेत.

या सर्व मिळालेल्या अनुदानांचा योग्य उपयोग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. त्याचे फलित म्हणूनच आजचे महाविद्यालयाचे प्रगत स्वरूप दिसून येत आहे.

यु.जी.सी. कडे पाठविण्याचे सर्व प्रस्ताव तयार करण्यासाठी व त्यांच्या पाठपुराव्यासाठी मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

**प्रा.ए.आर.माळी**
**यु.जी.सी. समिती**



Scanned with CamScanner

## बांधकाम समिती

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये महाविद्यालयातील बांधकाम आणि विकास प्रक्रिया सातत्याने सुरू राहिली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निधीमधून १ कोटी, १० लक्ष रूपयाची अवाढव्य अशी स्पोर्टस् कॉम्प्लेक्सची इमारत रंगरंगोटीसह पूर्ण करण्यात आली. सांस्कृतिक भवन इमारतीच्या वरती ज्युनिअर कॉलेजच्या लॅबची इमारत पूर्ण करण्यात आली असून सध्या क्लासरूम इमारतीचे काम सुरू आहे. महाविद्यालयाचा जिमखाना विभाग आणखी सशक्त करण्यासाठी ६ लाख रूपयाची विविध प्रकारच्या व्यायामाची उपकरणे उपलब्ध करण्यात आली आहेत. बास्केटबॉल या खेळामध्ये महाविद्यालयाचा चांगला संघ तयार व्हावा यासाठी २२ लाख रूपयांचे फ्लड लाईट बास्केटबॉल ग्राऊंड तयार करण्यात आले आहे. यामुळे महाविद्यालयाच्या सौंदर्यामध्ये मोठी भर पडलेली आहे. हे सौंदर्य आणखी वृद्धिंगत करण्यासाठी संपूर्ण ग्राऊंडचे सलग सपाटीकरण करून त्यामध्ये गोलाकृती असा लॉनला पीस तयार करण्यात आला आहे. ही हिरवळ प्रेक्षणीय ठरलेली आहे.

महाविद्यालयाच्या ग्राऊंडच्या सभोवती भिंतीचे दुहेरी कट्टे बांधून त्यामध्ये गाळाची माती भरून, नारळ, सप्तवर्णी चेरी अशा झाडांची तसेच विविध फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे. आणि त्याशेजारी सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे दहिवडी महाविद्यालय हे या परिसरातील निसर्गरम्य ठिकाण बनलेले आहे. भौतिक प्रगतीचे हे विविध उपक्रम राबविले जात असताना बांधकाम समितीला आणि सर्व सहकारी प्राध्यापकांना आनंद मिळाला. हे विविध उपक्रम राबविण्यामध्ये, महाविद्यालयाचे व्यापक आणि दूरदृष्टीचे मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांचे मार्गदर्शन, नियोजन आणि निरंतर प्रयत्न याचेच हे फलित होय.

**प्रा.आर.डी.जाधव, चेअरमन, बांधकाम समिती**

## अग्रणी कॉलेज योजना

चालू शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या दहिवडी कॉलेज, दहिवडी या महाविद्यालयाची शिवाजी विद्यापीठ प्रमुख अग्रणी कॉलेज म्हणून निवड केल्यामुळे महाविद्यालयाच्या सर्वांगीण वैभवामध्ये आणखी भर पडली आहे. दहिवडी कॉलेज, दहिवडी या अग्रणी कॉलेजच्या परिक्षेत्रामध्ये आसपासच्या आठ महाविद्यालयांचा समावेश करण्यात आला. या सर्वच महाविद्यालयामध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि संशोधन विचारांची देवाणघेवाण करण्यात येईल असे महाविद्यालयाने जाहीर करून दि.६/८/२०१३ रोजी अग्रणी कॉलेज योजनाच्या कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये तशी रूपरेषा ठरविण्यात आली. परिक्षेत्रातील महाविद्यालयांनी अग्रणी कॉलेज योजनेमधून कोणकोणते उपक्रम राबवावेत याचा निश्चित असा आराखडा तयार करून, काही सामाईक कार्यक्रमही ठरविण्यात आले. परिक्षेत्रातील महाविद्यालयामध्ये विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून उपक्रम राबविले जातील याबाबत उपयुक्त असे मार्गदर्शन या महाविद्यालयाने केले.

**व्याख्याने**

दहिवडी महाविद्यालयात अग्रणी कॉलेज योजनेमधून खालील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

दि.१४/९/२०१३ हिंदी दिनानिमित्त प्रा.डॉ.आर.पी.भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि.१७/९/२०१३ रोजी प्रा.डॉ.टी.एन.लोखंडे यांनी 'ओझोनचे जीवनातील महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. दि.२०/१/२०१४ रोजी भूगोल दिनानिमित्त प्रा.डॉ.सुधीर इंगळे यांनी 'माण-खटाव भौगोलिक परिस्थिती' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि.३०/१/२०१४ रोजी प्रा.डॉ.शिवाजीराव भोसले यांनी 'भारतातील अन्नसुरक्षितता' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि.२५/२/२०१४ रोजी प्रा.डॉ.एस.पी.शिंदे



Scanned with CamScanner

यांनी व्यक्तिमत्व विकास आणि स्पर्धा परीक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. दि.२८/२/२०१४ रोजी प्रा.डॉ.विजय माने यांनी 'सामाजिक कल्याण' या विषयावर मार्गदर्शन केले. दि.३/३/२०१४ रोजी मा.श्री.प्रफुल्ल कदम यांनी व्यक्तिमत्व विकास आणि ग्रामीण विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि.४/३/२०१४ रोजी मा.श्री.धनाजी पाटील यांनी 'मानव संसाधन विकास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाड्मय मंडळाच्या वतीने मा.प्राचार्य डॉ.एन.पी.गायकवाड यांचे व्याख्यान घेण्यात आले.

**कार्यशाळा**

दहिवडी महाविद्यालयात अग्रणी कॉलेज योजनेतून रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, अर्थशास्त्र आणि वाणिज्य विभाग, प्लेसमेंट सेल, करिअर कौन्सिलींग विभागातर्फे कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

दि.१९/१२/२०१३ रोजी 'बास्केटबॉल आणि त्यामधील कौशल्य' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत मा.श्री.अभय चव्हाण, सातारा जिल्हा अधिकारी व प्रा.बी.एस.पाटील यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी ८५ विद्यार्थी उपस्थित होते. दि.२०/१२/२०१३ 'जमीन आणि पाणी परिक्षण' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. मा.प्राचार्य सी.जे.खिलारे, मा.प्रा.डॉ.डी.व्ही. जगताप, मा.प्रा.अरविंद माळी, मा.प्रा.डॉ.एस.एम. खेत्रे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ३० प्राध्यापक व ८२ विद्यार्थी उपस्थित होते. दि.४/२/२०१४ 'कृषि उद्योगांची ग्रामीण विकासातील भूमिका' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. यावेळी मा.प्रा.डॉ.डी.के.मोरे, मा.प्रा.डॉ.अनिल वावरे, मा.प्रा.डॉ.डी.टी.चवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि.६/२/२०१४ करिअर संधी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. यामध्ये 'पदवीनंतरच्या विविध संधी' या विषयावर मा.प्रा.डॉ.आर.डी.कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मा.प्रा.एस.बी.रणधीर यांनी 'संभाषण कौशल्य' व मा.प्रा.ए.एच.कोळेकर 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जिमखाना विभागातर्फे योगा स्टडीज दि.६ व ७ फेब्रु.२०१४ रोजी 'योगा' स्टडीजवर 'व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली. यावेळी मा.प्रा.डॉ.एन.बी.बनसोडे यांनी 'निरोगी आरोग्यासाठी योग साधना' या विषयावर मार्गदर्शन केले. मा.डॉ.सौ.जी.पी.कुलकर्णी यांनी 'आनंदी जीवन जगण्यासाठी योगाभ्यास' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा.सीमा मडके यांनी 'योगा प्रात्यक्षिके' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि.१७/२/२०१४ रोजी वाणिज्य विभागाच्या वतीने सेलींग फेअरचे आयोजन करण्यात आले. यावेळी १८ स्टॉल उभे केले होते. दि.१९/३/२०१४ रोजी शिवाजी विद्यापीठ, अग्रणी कॉलेज आणि दहिवडी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने 'Academic Performance Indicators (API)' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ बी.सी.यु.डी.चे चेअरमन मा.प्राचार्य डॉ.ए.बी.राजगे यांच्या हस्ते झाले. यावेळी मा.प्राचार्य डॉ.पी.एन.चौगुले, मा.प्राचार्य डॉ.एल.जी.जाधव, मा.प्राचार्य डॉ.डी.आर.मोरे, मा.प्राचार्य डॉ.बी.एन.कालेकर, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र प्रमुख मा.प्रा.डॉ.व्ही.बी.जुगले, मा.प्राचार्य डॉ.आर.व्ही.शेजवळ व मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील प्राचार्य, नॅक समन्वयक आणि प्राध्यापक १०५ इतके सहभागी झाले होते.

**सहभाग**

या विविध उपक्रमाबरोबरच आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी इतर महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या उपक्रमामध्ये सहभागी झाले.



Scanned with CamScanner

दि.१५ डिसें.२०१३ रोजी कला वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव यांनी Functional Grammer या विषयावरील चर्चासत्र ७ जाने, २०१४ रोजी मुधोजी कॉलेज, फलटण व्याख्यानमाला, दि.४ जाने, २०१४ रोजी शहाजीराजे महाविद्यालय, खटाव Interview Technique या विषयावरील कार्यशाळा, दि.१७ डिसें.२०१३ रोजी कला वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव या महाविद्यालयाने महिला संरक्षण घटनात्मक व सामाजिक चौकट या विषयावरील कार्यशाळा, दि.७ जाने.२०१४ रोजी शहाजीराजे महाविद्यालय, खटाव यांचेवतीने लोककला सादरीकरण या विषयावर कार्यशाळा या विविध कार्यक्रमामध्ये आमचे विद्यार्थी तसेच प्रा.ए.एन.दडस, प्रा.एस.आर.स्वामी, प्रा.एन.यु.खोत, प्रा.एन.टी.फासे, प्रा.सौ.एस.बी.वाघमोडे, प्रा.भदाने सहभागी झाले.

अग्रणी कॉलेज योजनेअंतर्गत हे विविध उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.आर.डी.जाधव**
**समन्वयक अग्रणी कॉलेज योजना**

## परीक्षा विभाग (सिनिअर)

संगणकाच्या युगामध्ये परीक्षा पद्धतीमध्ये होणाऱ्या बदलाला विद्यार्थी सामोरा जावा या हेतूने शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने विद्यार्थी हा परीक्षार्थी न राहता तो स्पर्धेच्या युगामध्ये टिकला पाहिजे या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाबरोबरच त्याची महाविद्यालयातील उपस्थिती वाढली जावी यासाठी सत्र पद्धती सुरू केली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे प्रथम-द्वितीय सत्रामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाते. याशिवाय महाविद्यालयाचा अंतर्गत परीक्षा विभाग विद्यार्थ्यांची गुणवत्ता अधिक वाढावी यासाठी बी.ए.भाग २ व ३च्या विद्यार्थ्यांना ४० गुणांची प्रश्नपत्रिका घरी सोडविण्यासाठी दिली जाते. त्याचा परिणाम म्हणून महाविद्यालयाच्या तिन्ही शाखांचा निकाल हा नेहमी शिवाजी विद्यापीठाच्या निकालापेक्षा जास्त असतो. परीक्षा विभागाला नेहमी प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. यांचे मार्गदर्शन लाभते.

**प्रा.डॉ.बी.एस.बलवंत**
**चेअरमन,परिक्षा विभाग**

## खरेदी-विक्री समिती

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे महाविद्यालय स्तरावरती या समितीचे काम सुरू असते.

महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे विविध विभागासाठी वस्तूची आवश्यकता असते. संबंधित वस्तूची मागणी विभाग प्रमुखांमार्फत केली जाते. वस्तूची खरेदी करण्यापूर्वी कोटेशनची मागणी करून वस्तूची किंमत व गरज लक्षात घेऊन त्या वस्तूची खरेदी केली. यासाठी प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. व समिती सदस्य यांचे मोलाचे सहकार्य मिळते.

**प्रा.डॉ.बी.एस्.बलवंत**
**चेअरमन,खरेदी-विक्री समिती**

## वेळापत्रक समिती

महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षाची सुरवात वेळापत्रकाने होत असते. त्यामुळे वेळापत्रक तयार करतेवेळी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व रयत शिक्षण संस्था, सातारा यांचेकडील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येते.

महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून वेळापत्रकातील बदलांची आगाऊ सूचना विद्यार्थ्यांना दिली जाते. वेळापत्रकाशिवाय घेण्यात येणाऱ्या ज्यादा तासांची सूचना विद्यार्थ्यांना वेळापत्रक समितीमार्फत नोटीस बोर्ड लावण्यात येते.

**प्रा.डॉ.बी.एस्.बलवंत**
**चेअरमन,वेळापत्रक समिती**



Scanned with CamScanner

## संशोधन समिती

महाविद्यालयात संशोधन समिती व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मान्यताप्राप्त एम.फिल/ पी.एच.डी वनस्पतीशास्त्र व रसायनशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे.

१) या वर्षात महाविद्यालयातील प्राध्यापकांचे विद्यापीठ अनुदान आयोग (पुणे विभाग) यांच्या अर्थसहाय्याने लघुसंशोधन प्रकल्प/दीर्घ संशोधन प्रकल्पांचे संशोधनपर काम चालू आहे. त्यापैकी तीन प्रकल्पांच्या अनुदानाचे लेखापरीक्षण करून त्याविषयांच्या प्रकल्पाचे अहवाल यु.जी.सी.कडे सादर केलेले आहे. पाच प्रकल्पांचे काम प्रगती पथावर आहे.

२) महाविद्यालयातील पंधरा प्राध्यापकांनी त्यांचे एकवीस वेगवेगळे संशोधनपर लेख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सादर केले.

३) महाविद्यालयात संशोधन करणाऱ्या सर्व संशोधक प्राध्यापकांना आत्याधुनिक उपकरणे असलेली प्रयोगशाळा, सुसज्ज व समृद्ध ग्रंथालय, इंटरनेट व सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

त्याचबरोबर महाविद्यालयाच्या एम.फिल./ पी.एच.डी. संशोधन केंद्रामध्ये वनस्पतीशास्त्र विषयासाठी मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, प्रा.डॉ.डी. डी.नामदास व इतर महाविद्यालयातील आठ संशोधन मार्गदर्शक करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. व रसायनशास्त्र विषयात डॉ.डी.व्ही.जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थी पी.एच.डी. करीत आहेत.

**प्रा.डी.डी.नामदास**
**चेअरमन,संशोधन समिती**

## महिला लैंगिक तक्रार निवारण समिती व सचेतन समिती

महाविद्यालयात लैंगिक तक्रार निवारण समिती व सचेतन समिती अंतर्गत महिला प्राध्यापिका सदस्यांनी विद्यार्थिनींना लैंगिक छळ याविषयी माहिती देऊन विद्यार्थिनींना समुपदेशन केले.

'जागतिक महिला दिना' निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मा.सौ.इंद्रायणी मस्के व मा.डॉ.शुभांगी काटकर यांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. यावेळी दोनशे वीस विद्यार्थिनी व महिला सेवक उपस्थित होत्या.

**प्रा.सौ.एस.बी.वाघमोडे**
**चेअरमन, महिला लैंगिक तक्रार निवारण व सचेतना समिती**

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग (वरिष्ट [illegible]ग)

भार[illegible]कारच्या युवा, क्रीडा व मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम महाविद्यालयामध्ये कार्यरत असून सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये समाज सेवेची आवड असणाऱ्या २०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरापासून श्रमदानाची सुरुवात केली. श्रमदानाबरोबरच विधी साक्षरता शिबीर, शिक्षक दिन, HIV व TB विषयावर व्याख्यान, पथनाट्य, राष्ट्रीय मतदार जनजागरण रॅली, आम आदमी विमा योजना मार्गदर्शन व महत्त्व इ. व्याख्याने, कर्मवीर जयंती, एड्स जनजागरण रॅली, जि.प.सातारा व पं.स.माण यांच्यामार्फत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन, विशेष श्रमसंस्कार शिबीर आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. याशिवाय राष्ट्रीय सेवा समितीमधील प्राध्यापक व विद्यार्थी अनेक उपक्रमामध्ये सहभागी झाले होते.



Scanned with CamScanner

### विद्यापीठस्तरीय बैठक/राज्यस्तरीय विविध स्पर्धा व कार्यशाळा यामधील सहभाग -

| अ. क्र. | प्राध्यापक/ स्वयंसेवक नाव | कार्यशाळा/उपक्रम शिबीर स्तर | कालावधी | आयोजक |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा.रसाळ डी.के | राष्ट्रीय सेवा योजना नियोजन बैठकीमध्ये सहभाग | दि.२७/७/२०१३ | राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व शि.वि. कोल्हापूर |
| २. | प्रा.रसाळ डी.के | राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कार्यशाळा | दि.६/८/२०१३ | राष्ट्रीय सेवा योजना कक्ष शि.वि. कोल्हापूर |
| अ. क्र. | प्राध्यापक/ स्वयंसेवक नाव | कार्यशाळा/उपक्रम शिबीर स्तर | कालावधी | आयोजक |
| ३. | प्रा.महानवर आर.पी. | राष्ट्रीय सेवा कार्य नियोजन बैठक व रस्ता सुरक्षा अभियान मार्गदर्शन | दि.३/९/२०१३ | रा.से.योजना कक्ष व शि.वि. कोल्हापूर |
| ४. | श्री.आकाश हणमंत सावंत | स्वामी रामानंद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठ,नांदेड राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन [illegible] शिबीर सहभाग | दि.२/६/२०१३ ते ११/६/२०१३ | स्वामी रामानंद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |
| ५. | कु.श्रद्धा महादेव फडतरे<br>कु.गौरी चंद्रकांत जानकर<br>श्री.आकाश हणमंत सावंत | राज्यस्तरीय [illegible] आणि कन्या[illegible] वाचवा<br>अभियान दिंडी २०१३ | दि.१/७/२०१३ ते<br>दि.१९/७/२०१३ | विद्यार्थी कल्याण मंडळ व रा.से.योजना,पुणे विद्यापीठ व उच्च व तंत्र<br>शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य |
| ६. | श्री.कोळेकर प्रविण सर्जेराव<br>श्री.जाधव अविनाश धनाजी<br>श्री.सावंत जयदीप तुकाराम | राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, विभागामार्फत निवासी विद्यापीठ स्तरीय शिबीर | दि.३१/७/२०१३ ते दि.६/८/२०१३ | राष्ट्रीय सेवा योजना व शिवाजी विद्यापीठ |

**विशेष श्रमसंस्कार शिबीर**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व दहिवडी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९/१/२०१४ ते दि.१५/१/२०१४ अखेर राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे वावरहिरे येथे संपन्न झाले. या शिबीराचे उद्घाटन शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एन्.घोलप यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणचे तहसिलदार महेश पाटील हे होते. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांनी केले होते. सदरच्या कार्यक्रमासाठी मा.सरपंच विलास चव्हाण व ग्रामपंचायत सदस्य आदि मान्यवर उपस्थित होते.



Scanned with CamScanner

या शिबीरामध्ये स्वयंसेवकांनी श्रमदानातून वनराई बंधारे, ग्रामसफाई, वृक्षारोपण, राष्ट्रीय मतदार जगजागरण रॅली, बेटी बचाओ, अंधश्रद्धा निर्मूलन, हळदी-कुंकू समारंभ, पशुचिकित्सा शिबीर, रक्तातील हिमोग्लोबिन तपासणी आदि उपक्रमाद्वारे सामाजिक प्रबोधन, संवाद, परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

या विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप समारंभ प्रमुख पाहुणे मा.बाबासाहेब माने-हुलगे पं.समिती सदस्य माण यांच्या व कॉलेजचे प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. वावरहिरे ग्रामस्थांच्या वतीने सर्व शिबीरार्थी व प्राध्यापक यांचा प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.लुबाळ.एम्.जे व समिती सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**प्रा.डॉ.बी.एस्.बळवंत**
**चेअरमन,राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

## राष्ट्रीय सेवा योजना (कनिष्ठ विभाग)

मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर व शालेय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे सहकार्याने आमच्या महाविद्यालयात सन २०१३-२०१४ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) मार्फत विविध कार्यक्रम उपक्रम राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनामध्ये इ.११वी चे ५० विद्यार्थी प्रथम वर्षासाठी व इ.१२वी चे ५० विद्यार्थी द्वितीय वर्षासाठी सहभागी होते. दि.१०/०८/२०१३ अखेर विद्यार्थ्यांकडून श्रमदान करून घेण्यात आले. व त्यातून १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजने-मार्फत आण्णाभाऊ साठे स्मृतीदिन, राजर्षी छ.शाहू महाराज जयंती, शिक्षक दिन, साक्षरता दिन, पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील जयंती, एड्स दिन, मतदार जागृती दिन इ. उपक्रम घेण्यात आले.

तसेच मौजे वावरहिरे ता.माण,जि.सातारा येथे दि.९/१/२०१४ ते १५/१/२०१४ अखेर सात दिवसांचे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबविले. मान्यवरांची विविध विषयावर व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

**प्रा.जी.बी.लोहार**
**कार्यक्रम अधिकारी,रा.से.योजना (+२ स्तर)**

## सांस्कृतिक विभाग

हरहुन्नरी कलाकारांचा शोध घेऊन त्यांना आपली कला प्रकट करण्यासाठी एक वेगळं व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा वसा आणि वारसा सांस्कृतिक विभाग अखंडितपणे करीत आहे. सन २०१३-१४ या वर्षात सांस्कृतिक विभागाने शाहू महाराज जयंती, स्वातंत्र्यदिन, शिक्षक दिन, कर्मवीर जयंती व डॉ.आंबेडकर महानिर्वाण दिन तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी व शाहीर आण्णा भाऊ साठे जयंती प्रतिमा पुजनाने साजरी केली.

पुसेगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कॉलेजने समूहगीत, सुगमगीत, लोककला, मुकनाट्य, पथनाट्य, वाद्यवृंद, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व, प्रश्नमंजूषा इत्यादी कला प्रकारात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. गणेश सकट, अभिजीत औतडे, सचिन अवघडे, विशाल जाधव, अमृत बोराटे, विनय माने, राहूल हिंगमिरे, रणजीत सुर्यवंशी, अविनाश भिंगारे, अमर खरात, प्रफुल्ल दिक्षीत, नवनाथ बनसोडे, सुमित सिंदकर, कु.ऋतुजा जगदाळे, मयुरी जगदाळे, श्रद्धा फडतरे, स्नेहल गुळीक, मोनाली राऊत, प्रियांका अवघडे, प्रियांका शिंदे, वर्षा खाडे, प्राजक्ता जगदाळे, गौरी सकट, अदिनाथ दडस, अमोल काटकर हे विद्यार्थी सहभागी झाले.

तसेच मध्यवर्ती युवा महोत्सव जो वारणानगर येथे झाला. त्यामध्ये स्थलचित्रण प्रकारात अभिजित



Scanned with CamScanner

औतडे, नकला प्रकारात अतुल गायकवाड आणि फोटोग्राफीत अमोल इंगळे यांनी सहभाग नोंदवला.

सेवागिरी देवस्थान ट्रस्ट, पुसेगांव आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात वरील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पथनाट्यात द्वितीय आणि लोककला प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला आणि मिळालेल्या बक्षिसातून महाविद्यालयास 'एक कच्ची' भेट देऊन कॉलेजच्या सांस्कृतिक साहित्यात भर घातली.

'अंधश्रद्धा निर्मूलन' विषयक कार्यक्रम विवेकवाहिनीमार्फत महाविद्यालयाचा विद्यार्थी राहूल हिंगमिरे याने रवीकिर्ते सरांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. जिल्हा परिषद, सातारा आयोजित 'स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक' स्पर्धेत अभिजित औतडे याने [illegible] क्रमांक मिळविला तर वैशाली काटकर हिने द्वितीय आणि रेखा सूर्यवंशी हिने तृतीय क्रमांक पटकावला.

किर्लोस्कर वसुंधरा फेस्टिव्हल, कोल्हापूर या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील अमृत बोराटे याने काव्य लेखन स्पर्धेत भाग घेऊन सर्वश्रेष्ठ पाच मध्ये त्याची निवड झाली. तसेच दिगंबर जैन बोर्डींग, कोल्हापूर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कु.प्राजक्ता जगदाळे हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. तसेच २५ जानेवारी रोजी 'जागतिक मतदान जागृती दिना'निमित्त दहिवडी तहसील कार्यालयासमोर तसेच विविध ठिकाणी सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती पथनाट्य सादर केले. त्याबद्दल दहिवडी तहसीलदार व माण खटावचे प्रांत अधिकारी यांनी रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांचा गौरव केला. त्याचप्रमाणे प्रजासत्ताक दिनी समाज प्रबोधनात्मक पथनाट्य 'स्वप्न महासत्ता भारताचे' हे दहिवडी तसेच वाहरहिरे या ठिकाणी सादर केले.

कर्मवीर जयंती निमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये वक्तृत्व, रांगोळी, प्रश्नमंजूषा आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि विशेष यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धांसाठी प्राध्यापक श्री शैल्य स्वामी प्राध्यापिका नरूटे.एस.बी, प्राध्यापिका डॉ.रूखसाना मुल्ला, प्राध्यापक रवीकिर्ते सर यांचे विशेष सहकार्य लाभले.

दि.२६ फेब्रुवारी रोजी युवा दिनानिमित्त काव्य वाचन स्पर्धा पार पडल्या. त्यामध्ये नाजनीन मुल्ला हिने प्रथम क्रमांक, अभिजीत औतडे याने द्वितीय व स्नेहल गुळीक हिने तृतीय क्रमांक मिळवला.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे अभिनेता निलेश साबळे (फु बाई फु फेम) यांच्या हस्ते सांस्कृतिक विभागाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. तसेच त्यांनी आपल्या कलांमध्ये पारंगत होऊन यशस्वी होण्याविषयीचा मुलमंत्र आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना दिला. त्याचप्रमाणे सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी गणेश सकट याने प्रमुख पाहुण्यांचा नटराज मुर्ती भेट देऊन सत्कार केला.

सांस्कृतिक विभागाचे सर्वच कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच या विभागाचे सदस्य प्रा.श्री शैल्य स्वामी, प्रा.डॉ.बाळासाहेब बळवंत, प्रा.सौ.वाघमोडे यांचे सहकार्य लाभले.

**श्री.गणेश सकट**
**विद्यार्थी प्रतिनिधी**

**प्रा.अनिल दडस**
**चेअरमन, सांस्कृतिक विभाग**

## युवा महोत्सव (ज्युनिअर विभाग)

महाविद्यालयातील ज्युनिअर विभाग आणि व्यवसाय शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना देण्यासाठी 'युवा महोत्सव' आयोजित केला होता.

'युवा महोत्सवा'त निबंध, वक्तृत्व, भित्तीपत्रक, रांगोळी, प्रश्नमंजूषा, समूहगीत आणि



Scanned with CamScanner

लोकनृत्य अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या स्पर्धकांना दि.७ जानेवारी २०१४ रोजी बक्षीस वितरण समारंभात मा.प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. व मा.श्री.मुल्ला एम.जी. (उपविभागीय दंडाधिकारी, माण-खटाव) यांच्या हस्ते ट्रॉफी, मिडल व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. या प्रसंगी मा.श्री.मुल्ला एम.जी. आणि मा.प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

**श्री.एम.बी.कुमठेकर**
चेअरमन, युवा महोत्सव (ज्युनि.विभाग)

## राष्ट्रीय छात्र सेना

काळाची गरज आहे; ती सध्याच्या तरूण पिढीमध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिस्त, बंधुत्व आणि एकता यासारख्या गुणांची वाढ करण्यासाठी प्रत्येक नागरिकाच्या अंगातील सुप्त अवस्थेत असलेल्या सुसंस्कृत नागरिक जागा करण्याचे हे कार्य महाविद्यालयातून चाललेल्या राष्ट्रीय छात्रसेनेच्या अभ्यासेत्तर कार्यातून खूप मोठ्या प्रमाणात साकार होत आहे. ८५ शिस्तप्रिय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. (प्रथम वर्ष ४६ व द्वितीय वर्ष ३९ कँडेट)

चालू वर्षी नितीन ओंबासे याची सिनीअर अंडर ऑफिसर व संदेश जगदाळे आणि नितुल शिंदे यांची ज्युनियर अंडर ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.

१५ ऑगस्ट २०१३ 'स्वातंत्र्य दिन' मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या उपस्थितीत छात्रांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देऊन साजरा केला.

**विविध प्रशिक्षण शिबीरे :**

- वार्षिक प्रशिक्षण शिबीर २२ महाराष्ट्र बटालियन एन्.सी.सी. सातारा यांचेमार्फत महागाव (सातारा) येथे जुलै २०१३ मध्ये झालेल्या प्रशिक्षण शिबीरास आमच्या महाविद्यालयाचे १५ कँडेट सहभागी झाले होते. सप्टेंबर २०१३ मध्ये १५ कँडेट व जानेवारी २०१४ मध्ये ५ कँडेट्स सहभागी झाले होते.
- पांढरपाणी येथे झालेल्या वार्षिक प्रशिक्षण शिबीरात (नोव्हेंबर २०१३) १२ कँडेट सहभागी झाले होते.
- सप्टेंबर २०१३ च्या कँपमध्ये तुग ऑफ वॉर स्पर्धेत संदेश जगदाळे याने प्रथम क्रमांक मिळविला. जानेवारी २०१४च्या कँपमध्ये क्रॉस कंट्री स्पर्धेत अमोल देवकर याने तृतीय क्रमांक मिळविला. तसेच वाघमोडे ईश्वर याने प्रश्नमंजूषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

**राष्ट्रीय एकात्मता शिबीर :**

मे २०१३ मध्ये झालेल्या सातारा येथील शिबीरात १० कँडेट सहभागी झाले होते. तसेच गुजरात मधील व्ही.व्ही.नगर येथील कँपमध्ये सागर जगदाळे व वैभव नलवडे सहभागी झाले होते.

**थल सेना कँ[illegible]**

जून [illegible] मध्ये कोल्हापूर येथील पूर्व थल सेना कँप सा[illegible]हाविद्यालयातील ३ कॅडेटची निवड झाली होती.

**आर्मी अॅटेचमेंट कँप : (नोव्हेंबर २०१३) :**

अहमदनगर येथे झालेल्या कँप मध्ये ८ कॅडेट सहभागी झाले होते.

**इतर उपक्रम :**

- कंपनी कमांडर व कडेटस्नी मिळून पूरग्रस्तांना मदत केली.
- एड्स जगजागृती रॅली शनिवार दि.७/१२/१३ रोजी दहिवडी गावातून काढली.
- मतदार जागृती निमित्ताने एन्.सी.सी. छात्रांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.
- महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी वेळोवेळी सहकार्य करण्यात आले.

**प्रजासत्ताक दिन :**

प्रजासत्ताक दिनाचा राष्ट्रीय कार्यक्रम मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देऊन छात्रांनी शानदार



Scanned with CamScanner

संचलन करून दाखविले. याचे नेतृत्त्व सिनीयर अंडर ऑफिसर नितीन ओबासे याने केले.

**'सी' प्रमाणपत्र परीक्षा :**

सन २०१३-१४ मध्ये 'सी' प्रमाणपत्र परीक्षेस ३६ कॅडेट बसले होते.

चालू वर्षी घेण्यात आलेल्या बेस्ट कॅडेट स्पर्धेत प्रविण कदम याची बेस्ट कॅडेट म्हणून निवड झाली.

२२ महाराष्ट्र बटालियनचे प्रमुख कर्नल एस्.के.पांडे साहेब, प्रशासकीय अधिकारी कर्नल एच्.एन्.जाधव आणि त्यांचे सहकारी यांचेकडून आम्हांस भरपूर मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**कॅप्टन टी.एस्.माने**
**कंपनी कमांडर**

## य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र, दहिवडी

य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेमार्फत दहिवडी अभ्यासकेंद्राद्वारे बी.ए./बी.कॉम. अभ्यासक्रमाबरोबरच एम.बी.ए व पत्रकारिता पदविका कोर्सेससाठी मान्यता असल्यामुळे मुक्त विद्यापीठ स्थापने पाठीमागचा उद्देश्य प्रत्यक्ष अमलामध्ये आणला जातो. या अभ्यासकेंद्रामार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. व पुस्तकांचे वितरण केले. त्यांच्यासाठी तज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित केली. अभ्यासकेंद्राच्या स्थापनेपासून शेकडो स्त्री-पुरूषांनी नोकरी व गृहकर्तव्य सांभाळून पदवी प्राप्त केली आहे. सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षामध्ये साधारणपणे सातशे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पत्रकारिता पदविका प्रमाणपत्र हा अभ्यासक्रम सुरू आहे.

वरील सर्व प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

**प्रा.डॉ.बी.एस.बळवंत** — **केंद्र संयोजक**
**प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे** — **केंद्रप्रमुख**
**य.व.म.मु.वि.नाशिक अभ्यासकेंद्र-दहिवडी**

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

यावर्षी परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये एकूण ४३ विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आला. दिनांक १६/९/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीत स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. केंद्रामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची ग्रंथालयामार्फत पुस्तके उपलब्ध करून दिली.

या केंद्रामार्फत एन्ट्री इन सर्व्हिसेस यांचे मार्फत संयुक्तपणे मा.पोळ सुभाष, डिफेन्स ऑफिसर, जम्मू काश्मीर यांनी 'डिफेन्समधील संधी' याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले.

**प्रा.एस.एन.पवार**
**चेअरमन**

## सायकल वाटप समिती

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची कॉलेजला येण्यासाठी गैरसोय होऊ नये यासाठी वर्षभर सायकल वापरून परत देण्याच्या अटीवरती विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. सन २०१३-१४ मध्ये डॉ.भरत कारंडे (किरण हॉस्पिटल, दहिवडी) यांनी महाविद्यालयातील विद्यार्थीनींसाठी ५ सायकली कॉलेजला दिल्या व 'अहिल्यादेवी उत्कर्ष मंडळ' दहिवडी यांच्यामार्फत दोन सायकली कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी देण्यात आल्या. ही समिती मा.प्राचार्य डॉ.खिलारे सी.जे. यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यरत आहे.

**प्रा.शिंदे.के.एस.**
**चेअरमन,सायकल वाटप व संकलन समिती**

## बी.सी.सेल समिती

महाविद्यालयामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळावी यासाठी प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.सी.सेल समिती कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप विषयी माहिती व्हावी यासाठी सर्व विद्यार्थ्यांची बैठक



Scanned with CamScanner

आयोजित करण्यात आली होती. 'यशवंतराव चव्हाण व वेणूताई चव्हाण' शिष्यवृत्तीचे हुशार, गरीब व आर्थिक दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबत कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत. यासाठी समितीतील प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. शासनाकडून वेळोवेळी येणारी परिपत्रके व परिपत्रकातील माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविली.

**प्रा.शिंदे के.एस**
**चेअरमन,बी.सी सेल समिती**

## मुलींचे वसतिगृह

आपल्या महाविद्यालयात २००९ पासून मुलींच्या वसतिगृहाची सोय करण्यात आली आहे. प्रवेश सर्व मुलींच्यासाठी खुला आहे. वार्षिक प्रवेश फी व इतर फी घेऊन मुलींना प्रवेश दिला जातो. या वसतिगृहात ६४ मुली राहतील अशी व्यवस्था आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम, बी.सी.ए. आणि एम.एस्सी. या विविध विभागातील ५३ विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला.

प्रा. जाधव डी.बी. हे रक्टर म्हणून काम पाहतात. तसेच वसतिगृह कमिटीत नऊ सदस्य आहेत. वेळोवेळी या कमिटीची मिटींग घेऊन मुलींच्या समस्याविषयी चर्चा केली जाते. या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारेसाहेब वारंवार वसतिगृहास भेट देऊन मुलींना मार्गदर्शन करतात. वसतिगृहात पुढील सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

१) प्रशस्त इमारत व खोल्या.

२) अभ्यास, जेवण व करमणुकीसाठी स्वतंत्र खोल्या.

३) ॲक्वागार्ड (स्वच्छ पिण्याचे पाणी)

४) सोलर बंब (क्षमता १०० मुली)

५) उत्तम जेवणाची सोय.

६) सर्व सुविधांनी उपलब्ध १६ खोल्या.

७) सौर उर्जेद्वारे लाईटची सोय.

८) वॉचमन (रात्रंदिवस)

९) सी.सी. टिव्ही. कॅमेरा.

**प्रा.डी.बी. जाधव**
**रेक्टर, मुलींचे वसतिगृह**

## प्लेसमेंट सेल

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच परिसरातील इतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्लेसमेंट सेल मार्फत कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले जाते. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय व कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये 'कमिन्स इंडिया, फलटण', 'आरती ड्रग्ज, ठाणे', 'आय.आय.सी. आय.बँक', 'यझाकी इंडिया, पुणे', 'पारी, शिरवळ', कल्याणी फोर्ज, पुणे', 'महिंद्रा कनवेयरस्स, पुणे', 'लुपीन, मुंबई' तसेच कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून महाविद्यालयातील आजी, माजी व इतर महाविद्यालयातील २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व त्यातून ९३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. प्लेसमेंट सेल विविध उपक्रमांना मा. प्राचार्य डॉ.सी.जी. खिलारे यांची प्रेरणा व मार्गदर्शन लाभले.

**प्रा.डॉ.व्ही.एस. जमदाडे**
**चेअरमन, प्लेसमेंट सेल**

## R.T.S. दिशाप्रकल्प

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात R.T.S. दिशाप्रकल्पाचे उद्‌घाटन १६ ऑगस्ट २०१३ रोजी घेण्यात आले. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स यशस्वीरीत्या सुरू झाला. या कोर्समध्ये लेवल १ साठी ६९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. तसेच लेवल २ साठी २७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. हे सर्व विद्यार्थी बी.ए. भाग. व बी.कॉम. भाग १ व २ या वर्गातील होते. या प्रकल्पांतर्गत एकूण विहित १८ विषयांचे मार्गदर्शन वेगवेगळ्या विषय शिक्षकाकडून व गेस्ट व्याख्यात्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले.



Scanned with CamScanner

त्यासाठी महाविद्यालयातू एकूण १५ शिक्षक व इतर इंग्रजी विषयाचे अतिथी व्याख्याते ०५ व इतर व्याख्याते १० अशा एकूण ३० शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या प्रकल्पाच्या स्वतंत्र ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना ग्रंथाची देवाण-घेवाण करून अध्यापनासाठी व अधिक सरावासाठी चालना दिली गेली. लेवल १ साठीची ६९ मुले ही एकूण (१००) मुलांमधून पात्रता परीक्षा घेऊन निवड करण्यात आली होती.

या प्रकल्पाची लेखी व तोंडी परीक्षा घेण्यात आली. हा कोर्स यशस्वी करण्यासाठी सर्व विभागाच्या व विषयाच्या प्राध्यापकांनी व गेस्ट व्याख्यात्यांनी तसेच कार्यालयीन सेवकांनी फार मोलाचे सहकार्य केले.

**प्रा.डी.के. रसाळ**
समन्वयक

## हेल्थ सेंटर

सिनिअर महाविद्यालयातील [illegible], बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., एम.एस्सी. [illegible] शारीरिक व्यंग असलेल्या (अंध, अपंग, कर्णकधीर इ.) विद्यार्थ्यांना महाविद्यालयात शिक्षण घेत असताना अडचणी येऊ नयेत, यासाठी यु.जी.सी.च्या अनुदानातून HEPSN CENTRE चालविले जाते. या विद्यार्थ्यांना पुढील सुविधा सेंटरमार्फत पुरविल्या जातात. संगणक, इंटरनेट, आरामखुर्ची, ग्रंथालय, रिलॅक्स होण्यासाठी व आराम करण्यासाठी बेड इत्यादी. या सेंटरचा सात विद्यार्थी लाभ घेत आहेत.

सदर सेंटरला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जे. खिलारे वेळोवेळी भेटी देतात व मार्गदर्शन करतात.

**प्रा.डॉ.एस.एम. खेत्रे**
समन्वयक

## वाङ्मय मंडळ

या शैक्षणिक वर्षात वाङ्मय मंडळाच्य वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड, सौ. मंगलाताई जगताप, महिला महाविद्यालय उंब्रज यांचे हस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

मराठी, हिंदी व इंग्रजी विभागात वर्षभरात भित्तीपत्रके व कर्मवीर जयंती, शिक्षक दिनानिमित्त वाङ्मयीन प्रदर्शन आयोजित केली. प्रा. दडस यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन स्पर्धा घेतली. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी आपापल्या विषयांत 'नोकरीच्या संधी' संबंधी प्रदर्शनात भाग घेतला. वर्षभरातील या सर्व कार्यक्रमासाठी मा.प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. सुभाष रणधीर**
विभागप्रमुख

## विवेकवाहिनी

या शैक्षणिक वर्षात विवेकवाहिनीतर्फे विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम हाती घेतले. समाजातील अंधश्रध्दा दूर व्हावी यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जागृती होण्यासाठी राहुल हिंगमिरे या विद्यार्थ्याने पी.पी.टी. तयार करून सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

देशातील निवडणुकांच्या निमित्ताने होणारे गैरप्रकार याविषयी प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आला.

प्राथमिक आरोग्यकेंद्र, दहिवडीचे आरोग्य अधिकाऱ्यांनी आम्हाला भित्तीपत्रके पुरविली, त्यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागण्यात मदत झाली. या विभागातर्फे वर्षभर चालणाऱ्या या सर्व कार्यक्रमासाठी मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.डॉ. रविकिर्ती यांनी बहुमोल सहकार्य केले.

**प्रा. सुभाष रणधीर**
विभागप्रमुख

## सहल विभाग

दहिवडी कॉलेज दहिवडी मध्ये शैक्षणिक सहलींना अग्रक्रमाने प्राधान्य दिले जाते. सर्व सहली शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या अभ्यासक्रमानुसार व मा. सचिव. रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या परवानगीने आयोजित केल्या जातात. विविध विषयाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष ठिकाणी सर्वेक्षण करून



Scanned with CamScanner

माहिती संकलन केले जाते. आवश्यक ठिकाणी फोटोग्राफी केली जाते. तसेच सहभागी विद्यार्थ्यांकडून संक्षिप्त अहवाल घेतला जातो.

या वर्षामध्ये वनस्पतीशास्त्र विषयाची सहल कुळकजाई व गणपतीपुळे, राजापूर व कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सहलीमध्ये ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. सहलप्रमुख प्रा. माळी ए.आर. यांनी मार्गदर्शन केले.

इतिहास विभागातर्फे सिध्दटेक, औरंगाबाद, दौलताबाद, वेरूळ या ऐतिहासिक स्थळांच्या माहितीसाठी सहलींचे आयोजन केले. या सहलीमध्ये ४३ विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर विद्यार्थ्यांना प्रा. शिंदे के.एस. व प्रा. रसाळ डी.के. यांनी मार्गदर्शन केले.

भूगोल विभागामार्फत कोकण दर्शन - श्रीवर्धन - वज्रेश्वरी - ओझर येथे सहल नेण्यात आली. तेथील भौगोलिक परिस्थितीची पाहणी करून महत्त्वाच्या नोंदी घेतल्या. या सहलीमध्ये ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. सहल प्रमुख म्हणून प्रा. देशमुख एच.एल. व प्रा. पवार एस.एन. यांनी सहभाग घेतला.

**प्रा.व्ही.व्ही. कांबळे**
**चेअरमन**

## करिअर कौन्सिलींग सेल

दहिवडी महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी हे ग्रामीण भागातून येणारे आहेत विद्यार्थ्यांना शिकत असताना वेगवेगळ्या करिअरच्या संधीची माहिती व जीवनाची दिशा ठरवता यावी यासाठी महाविद्यालयात करिअर व कॉन्सिलींग सेल कार्यरत आहे. प्राचार्य डॉ.सी.जे. खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात करिअर व कॉन्सिलींग सेल मार्फत वर्षभर वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. करिअर कॉन्सिलींग मार्फत 1) Job Opportunities (नोकरीच्या संधी); 2) Carrier Fair (करिअर जत्रा) 3) Selling Fair (उद्योजक जत्रा); 4) Science Exibition (विज्ञान प्रदर्शन); 5) तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन इ. 6) One day Workshop (एकदिवसीय कार्यशाळा)

### एकदिवसीय कार्यशाळा

व्यक्तिमत्व विकास, संभाषण कौशल्य, करिअर संधी (अग्रणी कॉलेज अंतर्गत)

विद्यार्थ्याचे सर्वांगीण व्यक्तिमत्व विकसित करणे, त्याच्यामध्ये संभाषण कौशल्य वाढविणे व पदवीनंतरच्या कोणत्या करिअर संधी आहेत याची माहिती व्हावी या उद्देशाने 'अग्रणी कॉलेज योजना अंतर्गत व्यक्तिमत्व विकास, संभाषण कौशल्य व करिअर संधी' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करणेत आली. कार्यशाळेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ.सी.जे. खिलारे यांनी केले. प्रथमसत्रामध्ये डॉ.आर.डी. कुंभार (के.बी.पी. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, सातारा) यांनी पदवीनंतर विद्यार्थ्यांना कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा.एम.बी. भोसले यांनी व्यवस्थापन क्षेत्रातील करिअर संबंधी मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात प्रा. रणधीर एस.बी. यांनी 'संभाषण कौशल्य' व प्रा. कोळेकर ए.एच. यांनी 'व्यक्तिमत्व विकास' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेसाठी कला, वाणिज्य, विज्ञान बी.सी.ए. भाग-३च्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सदर उपक्रम यशस्वीपणे महाविद्यालयात संपन्न झाले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जे. खिलोरे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

**प्रा.डॉ.व्ही.एस. जमदाडे**
**चेअरमन**

## शॉर्ट टर्म कोर्सेस

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात वेगवेगळ्या प्रकारचे शॉर्ट टर्म कोर्सेस चालविले जातात. या शैक्षणिक वर्षामध्ये मराठी व हिंदी विभागामार्फत 'ग्रामीण पत्रकारिता' या कोर्सला



Scanned with CamScanner

४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. हा कोर्स बी.ए. भाग ३च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्रा.सौ.एस.बी. वाघमोडे यांनी काम पाहिले. इंग्रजी विभागामार्फत 'इंग्रजी संभाषण कौशल्य' या कोर्ससाठी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.बी.ए. भाग १ मधील सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्रा. फासे एम.टी. यांनी काम पाहिले.

भूगोल विभागामार्फत बी.ए. भाग ३च्या विद्यार्थ्यांसाठी पर्यटन हा कोर्स घेण्यात आला. या कोर्सला ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्रा. पवार एस.एन. यांनी काम पाहिले. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास विभागामार्फत मानव संसाधन विकास हा कोर्स घेण्यात आला. या कोर्सला बी.ए. भाग तीन मधील अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्रा.आर.डी. जाधव यांनी काम पाहिले.

